१०.	प्र. संचालक, मानव संसाधन केंद्र	डॉ.एस.आर. माणिक डॉ.पी.ए.वाडेगावकर	दि. ३०.११.२०१६ पर्यंत दि. ०१.१२.२०१६ पासून
११.	उपकुलसचिव (विद्या)	श्री दि.स.राऊत	
१२.	उपकुलसचिव (प्रशा.)	श्री प्र.वा. राठोड	
१३.	उपकुलसचिव (मावक)	श्रीमती स.मा. मोहोड श्री.म.के. वरखेडे डॉ.दा.रा. चव्हाण	दि. ३१.०८.२०१६ पर्यंत दि.०१.०९.२०१६ पासून दि.२५.०९.२०१६ पर्यंत (अतिरिक्त कार्यभार) दि. १०.०३.२०१७ पासून
१४.	उपकुलसचिव (विकास)	श्री मं.के.वरखेडे	
१५.	उपकुलसचिव (म.वि.)	डॉ.अ.धों.चव्हाण श्रीमती सु.वि. पाटील	 दि.१०.०३.२०१७ पासून
१६.	उपकुलसचिव (सारणी)	श्री.ऋ.व.दशमुखे	दि.२७.१२.२०१६ पासून
१७.	उपकुलसचिव (विधी)	श्री मं.म.जायले	
१८.	उपकुलसचिव (लेखा)	श्री व्हि.आर. मालवीय डॉ.नि.अं. कोळी	दि.२४.०३.२०१७ पर्यंत दि.२५.०३.२०१७ पासून
१९.	उपकुलसचिव (प/चौ.)	श्रीमती नि.कि.रंगारी	दि.३०.११.२०१६ पर्यंत
२०.	उपकुलसचिव (परीक्षा)	श्री.व्ही.आर. मालवीय	दि.२५.०३.२०१७ पासून

अ.क्र.	पदाचे नांव	अधिका-याचे नांव	कालावधी
२१.	सहा.कुलसचिव (प/चौ)	श्री.सं.अ.एरंडे	दि.०१.१२.२०१७ पासून दि.०९.०३.२०१७ पर्यंत (अतिरिक्त कार्यभार)
		श्रीमती मि.ह. मालधुरे	दि.१०.०३.२०१७ पासून
२२.	सहा.कुलसचिव (भांडार)	श्री.प्र.वि.फुलाडी	
२३.	सहा. कुलसचिव (अंके.)	श्री. शि.नि. कुळकर्णी	
२४.	सहा.कुलसचिव (गोपनीय)	श्री. वा.प.वानखडे	दि.०२.०५.२०१६ पासून (अतिरीक्त कार्यभार) दि.१२.०८.२०१६ माध्यान्होत्तरपासून नियमित
२५.	सहा.कुलसचिव (प्रशा.)	श्री. म.म. फरदळे	दि.३१.०१.२०१७ पर्यंत
		श्री.आर.जे. सयाम	दि.१४.०३.२०१७ पासून
२६.	सहा.कुलसचिव (सारणी)	श्री. दि.वि. वानखडे	दि.३१.०७.२०१६ पर्यंत
		श्री.ऋ.व. दशमुखे	दि.२६.१२.२०१६ पासून
२७.	सहा.कुलसचिव (लेखा)	श्री.ऋ.व. दशमुखे	दि.२५.१२.२०१६ पर्यंत
२८.	सहा.कुलसचिव (नामांकन)	श्री.सं.अ. एरंडे	
२९.	सहा.कुलसचिव (आचार्य कक्ष)	श्री.सु.रा.बंड	
३०.	सहा.कुलसचिव (म.वि.)	डॉ.आर.यु.येवतीकर	
३१.	सहा.कुलसचिव (प./चौ.)	कु.मो.सू. वानखेडे	दि.१३.०७.२०१६ पासून
३२.	सहा.कुलसचिव (वित्त)	श्री.आर.जे.सयाम	दि.१३.०८.२०१६ ते २५.०९.२०१६ पर्यंत
		डॉ.वि.भि.निमजे	दि.१०.०३.२०१७ पासून
३३.	सहा.कुलसचिव (मा.व.क.)	श्री.आर.जे.सयाम	दि.२६.०९.२०१६ पासून दि.१३.०३.२०१७ पर्यंत
		श्री.प्र.ऊ.तालन	दि.०१.०२.२०१७ ते १५.०३.२०१७
३४.	सहा.कुलसचिव (विद्या)	श्री.रा.मा.नरवाडे	दि. १०.०३.२०१७ पासून
३५.	सहा.कुलसचिव (निवडणुक कक्ष)	श्री.प्र.उ.तालन	दि. १६.०३.२०१७ पासून
३६.	कार्यकारी अभियंता	श्री.श.गु.रोडे	
३७.	प्रमुख, संगणक केंद्र	डॉ. दिनेशकुमार जोशी	
३८.	यंत्रणा विश्लेषक (संगणक केंद्र)	श्री.एन.एस. खान	

अ.क्र.	पदाचे नांव	अधिका-याचे नांव	कालावधी
३९.	यंत्रणा विश्लेषक (संगणक केंद्र)	डॉ.नि.अं. कोळी	दि.०६.०३.२०१७ पर्यंत
४०.	कार्यक्रमकर्ता (संगणक केंद्र)	श्री.सु.ना. नाफडे	दि. ३१.१०.२०१६ पर्यंत
		श्री.सं.ज. रामबोले	दि.२७.१२.२०१६ (मध्यान्होत्तरपासून)
४१.	सहा.ग्रंथपाल (ज्ञानस्रोत केंद्र)	श्री.डी.के. डोंगरे	
		श्री. वि.द. बापते	
४२.	संचालक (शा.शि.)	डॉ.अ.मु. असनारे	
४३.	माहिती शास्त्रज्ञ	श्री. रा.भ.जावळे	
४४.	विद्यापीठ उपअभियंता (विद्युत)	श्री.आर.एस. एडले	
४५.	जनसंपर्क अधिकारी	डॉ.वि.रा. नांदुरकर	
४६.	सुरक्षा अधिकारी	श्री.म.म.फरदळे	दि.३१.०१.२०१७ पर्यंत (अतिरिक्त कार्यभार)
		श्री.आर.जे.सयाम	दि. ०७.०४.२०१७ पासून (अतिरिक्त कार्यभार)
४७.	आरोग्य अधिकारी	डॉ.कु.स्मि.म.थोरात	दि.०६.०३.२०१७

१५) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा नियमित कर्मचारी वर्ग

१)शिक्षक पदे	शासनमान्य पदे	विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मान्य पदे	एकूण
प्राध्यापक	१७	–	१७
सह. प्राध्यापक	२९	२ *	३१
सहा. प्राध्यापक	६५	११*	७६
संचालक, ज्ञानस्रोत केंद्र	१	-	१
संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार	१	-	१
सहा. ग्रंथपाल	२	-	२
संचालक, शारीरिक शिक्षण	१	-	१
संचालक (ॲके. स्टाफ कॉलेज)	-	१*	१
प्रमुख, संगणक केंद्र	१	-	१
यंत्रणा विश्लेषक	२	-	२
माहिती शास्त्रज्ञ	१	-	१
	१२० + ७ @	१४*	१३४ + ७ @

* विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ व्या योजनेअंतर्गत दि. ३१.३.२०१७ पर्यंतच्या कालावधीकरिता मंजूर पदे.

@ ही पदे 'डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर फॉर हिस्ट्री ॲन्ड कल्चर' साठी एकत्रित वेतनावर मंजूर आहे.

शिक्षक संवर्गात :	**संचालक - १**	**प्राध्यापक - २**	**व प्रपाठक - ४**	**(एकूण ७)**
शिक्षकेतर संवर्गात :	साहाय्यक -१,	व शिपाई - १		(एकूण २)

२)	**शिक्षकेतर पदे**	**शासनमान्य पदे**	**विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे मान्य पदे**	**एकूण**
	प्रथम श्रेणी	४०	–	४०
	द्वितीय श्रेणी	२९	(* १ + **१** #) **२**	३१
	तृतीय श्रेणी	२६० + १० (भूतसंवर्गात मंजूर)	(* ४ + **१** #) **५**	२७५
	चतुर्थ श्रेणी	१५२	(* २ + **१** #) **३**	१५५
		४९१ + २ @	**(* ७ + ३ #) १०**	**५०१ + २ @**

***** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या १२ व्या योजनेअंतर्गत राज्यशासन जबाबदारी स्वीकारीपर्यंत मंजूर पदे.

@ ही पदे 'डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर फॉर हिस्ट्री ॲन्ड कल्चर' साठी एकत्रित वेतनावर मंजूर आहे.

शिक्षकेतर संवर्गात :	सहायक - १	व शिपाई - १	(एकूण २)

ही पदे 'वुमेन्स स्टडीज सेंटर' साठी एकत्रित वेतनावर खालीलप्रमाणे मंजूर आहे.

शिक्षकेतर संवर्गात	रिसर्च असिस्टंट -१	व शिपाई - १	(एकूण ३)
	प्रोफेशनल असिस्टंट - १		

****

प्रकरण दुसरे

३३ वा दीक्षांत समारंभ

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७

विद्यापीठाचा तेहतिसावा दीक्षांत समारंभ दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सन्माननीय कुलपती श्री चेन्नमनेनी विद्यासागर राव यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या उपस्थितीत संपन्न झाला व त्यांनी विद्यार्थ्यांना उद्‌बोधन केले. या दीक्षांत समारंभाला मुख्य अतिथी म्हणून बिहार राज्यातील राजगीर येथील नालंदा विद्यापीठाचे कुलपती पद्‌मभूषण डॉ.विजय भटकर, यांनी उपस्थित राहून दीक्षांत भाषण दिले. या दीक्षांत समारंभांला माजी कुलगुरू, प्र. कुलगुरू, माजी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिष्ठाते, कुलसचिव, प्राधिकरणांचे सदस्य त्याचप्रमाणे दानदाते, शासकीय अधिकारी, आचार्य पदवीधारक, गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

१) **दीक्षांत समारंभातील पदवीकांक्षींची संख्या :**

(एकूण पदवीकांक्षीची संख्या स्तंभ ३ व प्रत्यक्ष पदवी ग्रहण करणा-यांची संख्या स्तंभ ४ मध्ये दिली आहे.)

अ.क्र.	पदवीचे नांव	पदवीकांक्षीची संख्या	प्रत्यक्ष पदवी ग्रहण करणा-यांची संख्या
१	२	३	४
१.	वाङ्‌मय पारंगत	३७१८	३०१
२.	वाङ्‌मय स्नातक	८०४४	१३८८
३.	प्रादर्शिक कला स्नातक	०७	०१
४.	समाजकार्य पारंगत	२७१	४६
५.	समाजकार्य स्नातक	३६२	८७
६.	ग्रंथालय शास्त्र पारंगत	१७	०२
७.	ग्रंथालय शास्त्र स्नातक	१०१	०७
८.	पत्रकारिता पारंगत	१६	०७
९.	पत्रकारिता स्नातक	१९	१०
१०.	वाङ्‌मय स्नातक समाजकार्य	२२	०८
११.	बी. एफ. ए.	०९	०२
१२.	तत्त्वज्ञान पारंगत (कला)	०९	०१
१३.	तत्त्वज्ञान पारंगत (समाजशास्त्र)	०७	०१
१४.	वाङ्‌मय आचार्य	५१	३०
१५.	समाजकार्य आचार्य	८३	६०
१६.	वाणिज्य पारंगत	३७४	७९
१७.	वाणिज्य स्नातक	५४५५	११९०
१८.	व्यवसाय प्रशासन पारंगत	३१६	४०

१	२	३	४
१९.	व्यवसाय प्रशासन स्नातक	९९	१२
२०.	औद्योगिक संबंध आणि कार्मिक प्रशासन पारंगत	३९	०३
२१.	एम. सी. एम.	६१	१३
२२.	तत्त्वज्ञान पारंगत (वाणिज्य)	१९	०२
२३.	वाणिज्य आचार्य	५३	४२
२४.	विज्ञान पारंगत	९६४	२१८
२५.	विज्ञान स्नातक	३५७८	१२३१
२६.	संगणकशास्त्र स्नातक	५३७	१४७
२७.	पदव्युत्तर पदविका (वेब टेक अँन्ड मल्टीमीडिया)	–	–
२८.	पदव्युत्तर पदविका (मेक्याट्रोनिक्स)	०५	०२
२९.	विज्ञान आचार्य	१२४	१०२
३०.	गृहविज्ञान पारंगत	३७	१६
३१.	गृहविज्ञान स्नातक	९९	४०
३२.	फॅशन डिझायनिंग स्नातक	२४	१२
३३.	सौंदर्य प्रसाधने पारंगत	१८	०२
३४.	सौंदर्य प्रसाधने स्नातक	८५	१४
३५.	गृहविज्ञान आचार्य	–	–
३६.	शिक्षण पारंगत	६७	१०
३७.	शिक्षण स्नातक	१००३	४४
३८.	शारीरिक शिक्षण पारंगत	५१	०९
३९.	शारीरिक शिक्षण स्नातक (एक वर्षीय)	४६	०२
४०.	शारीरिक शिक्षण स्नातक (तीन वर्षीय)	५०	०७
४१.	पदव्युत्तर पदविका इन योगा थेरपी	–	–
४२.	शिक्षण आचार्य	२१	१५
४३.	शारीरिक शिक्षण आचार्य	३२	२०
४४.	विधी पारंगत	३८	०७
४५.	विधी स्नातक (तीन वर्षीय)	२६०	३५
४६.	विधी स्नातक (पांच वर्षीय)	१०	०३
४७.	बी. ए. इन. लॉ.	५५	१३
४८.	पदव्युत्तर पदविका इन मानव अधिकार	०४	०१
४९.	पदव्युत्तर पदविका इन टॅक्सेशन	०२	०१

१	२	३	४
५०.	पदव्युत्तर पदविका इन मेडीकल ज्युरी	०३	०१
५१.	आचार्य विधी	०६	०६
५२.	भेषजी पारंगत	५२	१६
५३.	भेषजी स्नातक	५००	४१
५४.	भेषजी आचार्य	०५	०५
५५.	अभियांत्रिकी पारंगत /एम. टेक	५१६	८२
५६.	विज्ञान पारंगत (उपयोजित परमाणू)	१३	०६
५७.	संगणकशास्त्र पदव्युत्तर पदविका	११	०३
५८.	अभियांत्रिकी स्नातक	७०११	८३२
५९.	अभियांत्रिकी स्नातक (पार्ट टाईम)	०१	–
६०.	तांत्रिकी स्नातक (सर्व)	१०८	३६
६१.	वस्त्रोद्योग स्नातक	६७	०३
६२.	वास्तुशास्त्र स्नातक	५५	१८
६३.	एम. सी. ए.	१३२	४३
६४.	अभियांत्रिकी आचार्य	८१	८१

२) तेहतिसावा दीक्षांत समारंभ

दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७

मा. कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांचे प्रास्ताविकपर भाषण

नमस्कार!

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या तेहतिसाव्या दीक्षांत समारंभाचे प्रमुख अतिथी महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल मा. श्री. चेन्नमनेनी विद्यासागर राव, जागतिक कीर्तीचे संगणकतज्ज्ञ पद्मश्री मा. डॉ. विजय भटकर, समारंभास उपस्थित संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सर्व पूर्व-कुलगुरू, प्र-कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन व विद्वत परिषद तसेच विविध प्राधिकरणांचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, उपस्थित लोकप्रतिनिधी, प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठाचे अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी, शिक्षणप्रेमी नागरिक, पत्रकार बंधू आणि माझ्या विद्यार्थी मित्रांनो..

विद्यापीठाच्या तेहतिसाव्या दीक्षांत समारंभात कुलगुरू म्हणून मी आपणा सर्वांचे सहर्ष स्वागत करतो आणि आजच्या दीक्षांत समारंभास लाभलेल्या अतिथींचा परिचय करून देतो.

आज दीक्षांत समारंभास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल आणि विद्यापीठाचे कुलपती महोदय मा. श्री. सी. विद्यासागर राव हे आपल्यात उपस्थित आहेत. सार्वजनिक जीवनातील जनसेवेचा व्यापक आणि बहुविध अनुभव असलेले विद्यासागर राव हे तेलंगणा राज्यातील एक वरिष्ठ नेते राहिले आहेत. श्री. अटल बिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात ते सुरुवातीला केंद्रीय गृहराज्यमंत्री आणि त्यानंतर वाणिज्य व उद्योग खात्याचे राज्यमंत्री होते. विज्ञान स्नातक ही पदवी मिळवल्यानंतर त्यांनी उस्मानिया विद्यापीठातून कायद्याची पदवी प्राप्त केली. १९७३साली करीमनगर जिल्ह्यात त्यांनी वकिलीची सुरुवात केली. सार्वजनिक जीवनात कार्य करण्याची त्यांना लहानपणापासूनच ओढ होती. मेटपल्ली विधानसभा मतदारसंघातून ते १९८५, १९८९ व १९९४असे सलग तीन वेळा आंध्रप्रदेश विधानसभेवर निवडून गेलेत. १९९८ आणि १९९९साली ते लोकसभेवर निवडून गेलेत. दि. ३० ऑगस्ट २०१४रोजी त्यांनी महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची शपथ घेतली. अतिशय मितभाषी असलेले विद्यासागर राव हे एक प्रेरक व्यक्तिमत्त्व आहे. त्यांना आदिवासींच्या प्रश्नांची उत्तम जाण असून प्रत्यक्ष आदिवासी भागात त्यांनी कार्य केले आहे. आदिवासींच्या जीवनाविषयी ते आस्था बाळगतात. संत गाडगे बाबांच्या विचार व कार्यावर त्यांची श्रद्धा असल्यामुळेच संत गाडगे बाबांचे जन्मगाव शेणगाव येथे त्यांनी गाडगे बाबांचा पुतळा पाठवला होता. आज गाडगे बाबांची जयंती. या जयंतीदिनीच विद्यापीठातर्फे उभारल्या गेलेल्या गाडगे बाबांच्या संदेशशिल्पाचे लोकार्पण करण्यासाठी गाडगे बाबांविषयी श्रद्धा असणारे कुलपती मा. विद्यासागर राव उपलब्ध व्हावेत, यासारखा भाग्याचा क्षण कोणता? खरोखरच हा दुग्धशर्करा योग म्हणावा लागेल. या मंगलमयप्रसंगी मी त्यांचे मनःपूर्वक स्वागत करतो.

आजचे दुसरे अतिथी म्हणजे परम महासंगणकाचे जनक डॉ. विजय भटकर. अमेरिकेने भारताला महासंगणक देण्याचे नाकारल्यानंतर त्यावेळच्या पंतप्रधानांचे आवाहन स्वीकारून परमश्रेणीतल्या महासंगणकाची निर्मिती डॉ. विजय भटकर यांनी केली व भारताचा लौकिक जगात उंचावला. ते मूळचे आपल्याच परिसरातील. अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर तालुक्यातील मुरंबा या गावचे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग व पीएच.डी.पर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. शिक्षणानंतर नोकरीसाठी आलेली परदेशातील आमंत्रणे नाकारून भारतातच राहायचे ठरवले. विक्रम साराभाई यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या इलेक्ट्रॉनिक्स कमिशनवर त्यांनी दहा वर्षे कार्य केले. सी-डॅक, इलेक्ट्रॉनिक रिसर्च ॲंड डेव्हलपमेंट सेंटर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन ॲंड मॅनेजमेंट-केरला, इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, एमकेसीएल, इंडिया इंटरनॅशनल मल्टिव्हर्सिटी अशा अनेक राष्ट्रीय संस्थांची त्यांनी रचना केली आहे. १९९२च्या एशियाडच्या वेळी भारतात दूरदर्शनचे प्रसारण रंगीत असावे, असे सरकारला वाटले. इतर जेष्ठ शास्त्रज्ञांच्या मते हे शक्य नव्हते. हे उद्दिष्ट भटकरांनी पूर्ण केले. त्यांचे आतापर्यंत १२ पुस्तके व ८० शोधनिबंध प्रसिद्ध असून हे साहित्य देशोदेशी विद्यापीठांतून अभ्यासले जाते. त्यांना जागतिक इलेक्ट्रॉनिक्स व संगणक

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

नॅक 'अ' मानांकन

तेहतिसावा दीक्षांत समारंभ

गुरुवार, दि. २३ फेब्रुवारी, २०१७

पहिली रांग (डावीकडून उजवीकडे) - डॉ.जी.आर. बमनोटे, डॉ.एफ.सी.रघुवंशी, डॉ.आर.एस.जयपूरकर, डॉ.ए. व्ही. चांदेवार, डॉ.अर्चना नेरकर, प्रमुख अतिथी डॉ.विजय भटकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.कुलपती श्री चे.विद्यासागर राव, मा.कुलगुरु डॉ.मुरलीधर चांदेकर, प्रो.डी.एन.शिंगाडे, डॉ.एम.एच.तायडे, डॉ.व्ही.एस.चौबे, डॉ.एम.एच.लाकडे, कुलसचिव डॉ.अजय पी.देशमुख

दुसरी रांग (डावीकडून उजवीकडे) - डॉ.एस.आर.आस्वले, डॉ.जे.डी.वडते

विद्यादंडधारक - श्री एम.एस.वेताळकर, श्री यु.जे.ठाकूर

क्षेत्रातील सर्वश्रेष्ठ समजल्या जाणा-या संस्था IEEE व ACM यांनी 'फेलो' या अत्युच्च पदवीने पुरस्कृत केले आहे. 'महाराष्ट्र भूषण' व 'पद्मश्री' हे सर्वोच्च नागरी सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत. अलीकडेच नालंदा आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलपती म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

एक आदर्श वैज्ञानिक, संगणकतज्ज्ञ, विज्ञान आणि अध्यात्म यांची सांगड घालणारे तत्त्वज्ञ डॉ. विजय भटकरांचे मी आजच्या दीक्षांत समारंभात मनःपूर्वक स्वागत करतो.

मित्रहो, दि. १ मे १९८३रोजी अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. पुढे सन २००४मध्ये संत गाडगे बाबांचे नाव ह्या विद्यापीठाला देण्यात आले. अगदी स्थापनेपासूनच संत गाडगे बाबांच्या दशसूत्रीचा अवलंब करत, समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य विविध शैक्षणिक विभाग व संलग्नित महाविद्यालयांच्या माध्यमातून विद्यापीठाने चालविले आहे. आज संलग्नित महाविद्यालयांची संख्या ७०वरून **४१०**एवढी झाली असून **१२८**महाविद्यालये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या २ (f)/१२ (B)सूचीमध्ये समाविष्ट झालेली आहेत. विविध महाविद्यालये तसेच विद्यापीठातील २३शैक्षणिक विभागांतून नऊ विद्याशाखांतर्गत पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण विद्यापीठात दिले जाते. सुमारे तीन लक्ष विद्यार्थी आणि सुमारे पाच लक्ष परीक्षार्थी या शिक्षण प्रक्रियेत सहभागी आहेत. राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद, बंगलोरतर्फे(नॅकतर्फे) 'अ'श्रेणी प्राप्त करणारे आपले विद्यापीठ कुशल मनुष्यबळनिर्मितीसाठी कटिबद्ध आहे. जागतिकीकरणाच्या आजच्या आव्हानात गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी विद्यापीठ नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम, संशोधन संस्था-औद्योगिक संस्थांशी करार, कौशल्यविकासाच्या उपक्रमांवर भर इत्यादी मार्गांनी वाटचाल करत गुणवत्तेचे एक एक शिखर गाठत आहे. विद्यापीठाच्या गुणवत्तेचे एक प्रतीक म्हणजेच आजचे हे गुणवत्ता यादीतील तसेच संशोधनक्षेत्रातील यशवंत. आज दीक्षांत समारंभामध्ये विद्यापीठातर्फे विविध विद्याशाखांमधील **४५६**संशोधकांना आचार्य पदवी तसेच विविध परीक्षांतील गुणवत्ता यादीत स्थान पटकावणा-यांना **१०५सुवर्णपदके, २२रौप्यपदके आणि २४रोख पारितोषिकांचे** वितरण करण्यात आले.

विद्यापीठांतील शैक्षणिक विभाग आणि संलग्नित महाविद्यालयांतील विविध शैक्षणिक विकासात्मक कामे प्रगतिपथावर आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या बाराव्या योजनेत मंजूर झालेल्या रु. १३.९९कोटी अनुदानापैकी आतापर्यंत रु. ५.५९कोटी अनुदान विद्यापीठाला प्राप्त झाले असून संबंधित कामे प्रगतिपथावर आहेत. विद्यापीठातील भौतिक सोयी-सुविधांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून या वर्षी त्यात केंद्रीय मूल्यांकन भवन विस्तारित इमारत, इंग्रजी विभाग व भाषा प्रयोगशाळा, कर्मचारी भवनातील अतिथी गृह या पूर्ण झालेल्या बांधकामांची नव्याने भर पडली. पुढील काही महिन्यात पूर्णत्वास येत असलेल्या बांधकामांमध्ये गृहविज्ञान विभागातील दृकश्राव्य स्टुडिओ तसेच विद्यापीठाच्या साधारण निधीतून बांधण्यात येत असलेल्या संशोधन करणा-या विद्यार्थ्यांच्या वसतिगृहाचा समावेश आहे. विविध अध्यासनांच्या माध्यमातून सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्याच्या कार्यात विस्तार होण्यासाठी आणखी काही अध्यासनांची तसेच कौशल्य विकास केंद्र, मेळघाट आदिवासी संशोधन केंद्र यांची मागणी विद्यापाठाने शासनाकडे प्रस्ताव सादर करून केली आहे.

संशोधनक्षेत्रातही विद्यापीठ अग्रेसर असून विविध विभागांमधून संशोधनप्रकल्प राबविले जात आहेत. सद्यःस्थितीत सात विद्यापीठ संशोधकांचे संशोधन प्रकल्प सुरू आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून या वर्षी एका प्राध्यापकाला बीएसआर फॅकल्टी फेलोशीप मंजूर झाली. उपयोजित परमाणू विभागातील एका प्राध्यापिकेचे पेटंट प्रकाशित झाले. रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त गणित विभाग आणि वनस्पतिशास्त्र विभाग यांनी अनुक्रमे 'गणितविज्ञानातील नवे बदल' आणि 'वनस्पतिविविधता : काल आणि आज' या विषयांवर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले. मराठी विभागातर्फे मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील सेमाडोह या निसर्गरम्य ठिकाणी 'कथालेखन कार्यशाळा' तसेच दि. १९ ते २१जानेवारी या दरम्यान 'लोककला महोत्सव' यांचे आयोजन करण्यात आले. आदिवासींच्या पारंपरिक कलांना व्यासपीठ मिळवून देणारा अशा प्रकारचा महोत्सव विद्यापीठात पहिल्यांदाच आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात कोरकू, गोंड, भिल्ल, कोलाम-परधान इत्यादींच्या कलांचे सादरीकरण झाले. याव्यतिरिक्त ग्रंथालयशास्त्र व माहितीशास्त्र विभाग, गृहविज्ञान विभाग, स्त्री अभ्यास केंद्र, प्रौढ, निरंतर शिक्षण व विस्तार सेवा विभाग, उपयोजित परमाणू या विभागांनी अनुक्रमे 'इ-रिसोर्सेस', 'संशोधन पद्धती आणि तंत्र', 'भाषा व सामाजिक शास्त्रांच्या अध्यापन आणि संशोधनात लिंगभाव संकल्पनेचे उपयोजन', 'प्रकाशयान सौरउर्जानिर्मिती', 'एलईडी लॅम्पनिर्मिती' या विषयांवर कार्यशाळेचे आयोजन केले. संलग्नित महाविद्यालयांतर्फेदेखील विविध विषयांवर चर्चासत्र-परिषदांचे आयोजन करण्यात आले.

विद्यापीठाच्या विविध विभागांमधील तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांना विविध मानसन्मान प्राप्त झाले आहेत. रासायनिक तंत्रज्ञान विभागप्रमुख, वनस्पतिशास्त्र विभागप्रमुख यांची राष्ट्रीय स्तरावरील संस्थांवर नियुक्ती झाली. विद्यापीठातील काही विभागातील प्राध्यापकांनी आंतरराष्ट्रीय प्रकल्प, चर्चासत्र परिषदांतून सहभागी होत विद्यापीठाचा नावलौकिक उंचावला.

दि. २० डिसेंबर २०१६रोजी 'पर्यावरण पुरस्कार २०१६' तसेच 'श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार २०१६' यांचे विद्यापीठातर्फे वितरण करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीचे अंग विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सत्र २०१६-१७मध्ये स्वच्छ भारत-स्वस्थ भारत अभियान, वृक्षारोपण, रक्तदान, जलसंवर्धन, एड्स जनजागृती, मतदार जनजागृती, रस्ता सुरक्षा अभियान इत्यादी कार्यक्रम राबविण्यात आलेत. बळीराजा चेतना अभियान तसेच आव्हान-२०१६ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबिर हे उपक्रम पाचही जिल्ह्यांत राबविण्यात आलेत. कॅशलेस व्यवहाराच्या प्रसारासाठी रस्त्यावरचे फेरीवाले, हातगाडीवाले, छोटे विक्रेते यांना प्रत्यक्ष शिकवण्याचा उपक्रम स्वयंसेवकांनी राबविला. दि. २१ जून २०१६रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. राज्यस्तरीय कार्यशाळा, शिबिरे यांतून विद्यापीठाचे प्रतिनिधित्व विद्यार्थ्यांनी केले. दि. २४ जून २०१६रोजी रासेयो पुरस्कार तसेच विद्यापीठस्तरीय स्वच्छ भारत अभियान पुरस्कार वितरित करण्यात आलेत.

विविध कला व क्रीडा स्पर्धांमध्ये सलग या वर्षीसुद्धा विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली. सप्टेंबर २०१६मध्ये तात्यासाहेब महाजन कला, वाणिज्य महाविद्यालय, चिखली, जि. बुलडाणा येथे आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. पंडित रविशंकर शुक्ल विद्यापीठ, रायपूर येथे नोव्हेंबर २०१६मध्ये संपन्न झालेल्या मध्य विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत विद्यापीठ चमूने एकांकिका प्रकारात द्वितीय क्रमांक तर फोक ऑर्केस्ट्रॉ, पाश्चात्त्य समूहगान, शास्त्रीय गायन, सुगम संगीत, स्वरवाद्य (सोलो), पाश्चात्त्य गायन (सोलो), मिमिक्री, वादविवाद, कार्टुनिंग या प्रकारांत तृतीय क्रमांक प्राप्त केला तसेच संगीत प्रकारात उपविजेता ट्रॉफी पटकावली. तसेच अखिल भारतीय युवा महोत्सव स्पर्धेत शास्त्रीय संगीत या प्रकारात विद्यापीठ चमूने द्वितीय स्थान प्राप्त करत घवघवीत यश संपादन केले.

मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रेरणेने सत्र २००३-२००४पासून महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'इंद्रधनुष्य' युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत आपल्या विद्यापीठातील चमूने सहभाग नोंदवत वक्तृत्व स्पर्धा आणि स्पॉट फोटोग्राफी या प्रकारांतून तिसरे स्थान प्राप्त केले.

या वर्षी विद्यापीठ परिसरात विविध शैक्षणिक विभागांतील विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी विद्यापीठ अनुदान योजनेच्या १२व्या योजनेअंतर्गत जानेवारी २०१७मध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ३६५विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विविध कलास्पर्धांप्रमाणेच क्रीडास्पर्धांमध्येदेखील विद्यापीठ चमूंनी उत्तम कामगिरी बजावली आहे. भोपाळ येथील बरकतउल्लाह विद्यापीठात जानेवारी २०१७मध्ये झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रिकेट स्पर्धेत विद्यापीठाच्या चमूने **प्रथम स्थान** पटकावत ऐतिहासिक कामगिरी केली. आजवरच्या तेहतीस वर्षांच्या विद्यापीठाच्या इतिहासात विद्यापीठाला पहिल्यांदाच क्रिकेटमध्ये असे यश प्राप्त झाले आहे. याच चमूने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत तृतीय स्थान पटकावले आहे. कुलगुरू या नात्याने मी या खेळाडूंचे विशेष अभिनंदन करतो. जानेवारी २०१७मध्ये कोट्टायम येथील महात्मा गांधी विद्यापीठाने अलुवा येथे आयोजित केलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल स्पर्धेत (मुले) आणि भोपाळ येथील बरकतउल्लाह विद्यापीठात संपन्न झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत (मुले) विद्यापीठ चमूने **द्वितीय** स्थान प्राप्त केले. पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धांपैकी फुटबॉल (मुली) या प्रकारात पाटण(गुजरात) येथे आपल्या चमूने तृतीय स्थान प्राप्त केले. फुटबॉल, कबड्डी, हॉकी या स्पर्धांतील चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धांसाठी पात्र ठरल्या. बॉक्सिंग(मुले) या प्रकारात विद्यापीठ चमू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेत विद्यापीठाच्या खेळाडूने ६०किलो वजनगटात **कांस्य पदक** प्राप्त केले. परभणी येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ 'अश्वमेध' क्रीडा महोत्सव २०१६या स्पर्धेत विद्यापीठाने व्हॉलीबॉल(मुले) या प्रकारात **द्वितीय** स्थान पटकावले. याच स्पर्धेत व्हॉलीबॉल सामन्यासाठी पंच म्हणून काम करण्याचा गृहविज्ञान विभागातील विद्यार्थिनीला मान प्राप्त झाला. वैयक्तिक क्रीडाप्रकारांत १५००मीटर धावणे या प्रकारात रौप्य पदक प्राप्त झाले. अखिल भारतीय धनुर्विद्या ७० मीटर रिकर्व्ह राऊंडमध्ये विद्यापीठाला सुवर्णपदक तर इंडियन राऊंड ३०मीटर स्पर्धेत रजत पदक प्राप्त झाले आहे.

नेहमीप्रमाणे याही वर्षी विद्यापीठातर्फे २०१५-२०१६या सत्रासाठी उत्कृष्ट खेळाडू पुरस्कार प्रदान करण्यात आलेत.

नांदेड येथे स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात संपन्न झालेल्या 'आविष्कार' स्पर्धेत विद्यापीठ चमूतील दोन विद्यार्थ्यांनी पारितोषिके पटकावली.

सर्व यशस्वी खेळाडू, कलावंत तसेच संशोधक विद्यार्थ्यांचे मी कुलगुरू या नात्याने अभिनंदन करतो.

विद्यार्थी कल्याण विभागामार्फत अनेक योजना राबविण्यात आल्या आहेत. सत्र २०१६-१७ मध्ये विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती अंतर्गत एकूण २२८विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. संत गाडगे बाबा विद्याधन योजनेअंतर्गत पात्र ६४ विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य करण्यात आले. तसेच या शैक्षणिक वर्षाकरिता संलग्नित महाविद्यालय व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांतील एकूण १,९१,२२८ विद्यार्थ्यांचा सुरक्षा विमा काढण्यात आला.

विद्यापीठास समृद्ध असे ग्रंथालय लाभले आहे. ग्रंथालयात १,१२,२७६ ग्रंथ, १२६ इ-बुक्स, २९७५ आचार्य पदवी प्रबंध, ७०८७ डेझरटेशन्स, १५३ नियतकालिके, पंचवीस हजारपेक्षा जास्त इ-जर्नल्स, नऊ ऑनलाईन डेटा बेसेस इत्यादी ज्ञानसंपदा उपलब्ध आहे. ग्रंथालयाच्या विविध सुविधांमध्ये बुक बॅक, लायब्ररी पोर्टल, इ-रिसोर्स ॲक्सेस सेंटर, वेब ओपॅक, रिमोट ॲक्सेस, फेडरेटेड सर्च, ॲंटी प्लॅगियारिझम व युवर अवेअरनेस प्रोग्रॅम यांचा समावेश आहे. इ-ग्रंथालयाचा उपयोग जगात २५पेक्षा अधिक देशातील वाचक करीत असून यास आजपर्यंत साडेपाच कोटीपेक्षा अधिक हिट्स मिळाल्या आहेत. तसेच ९२लाखापेक्षा अधिक पृष्ठ त्यातून डाऊनलोड करण्यात आले आहेत. ग्रंथालयातर्फे दि. १५ ऑक्टोबर २०१६रोजी वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात आला. अलीकडेच निवासी ज्ञानस्रोत आणि संशोधन केंद्रासाठी ग्रंथालयाद्वारे शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला.

विचारांचे आदानप्रदान, प्रशिक्षण, संशोधन साहाय्य इत्यादींसाठी विद्यापीठाने आतापर्यंत सहा राष्ट्रीय व तीन आंतरराष्ट्रीय संस्थांशी सामंजस्य करार केले असून यात आदिवासी जनजातींच्या संशोधनासाठी आयर्लंड येथील विद्यापीठाशी झालेला तसेच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अग्रणी कंपनी टीसीएससोबत कुशल रोजगारक्षम मनुष्यबळ घडावे या हेतूने प्रशिक्षणसुविधेचा झालेला करार समाविष्ट आहे.

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वास आकार देण्यासाठी विद्यापीठातर्फे शैक्षणिक कौशल्य वर्गांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सूत्रसंचालन प्रशिक्षण, मराठी शुद्धलेखन, स्पोकन इंग्लिश, उपकरण हातळणी या वर्गांचा समावेश आहे. 'लाईफ कोपिंग स्कील्स' अंतर्गत विद्यार्थ्यांचे पाच दिवसांचे प्रशिक्षण तसेच 'ट्रेन द ट्रेनर' या उपक्रमांतर्गत विद्यापीठातील प्राध्यापकांसाठी प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाद्वारे कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत अकरा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेत. अशा प्रकारचे अभ्यासक्रम पहिल्यांदाच विद्यापीठात सुरू झाले आहेत. व्यावसायिक जगात सक्षमपणे उभे राहण्यासाठी विद्यार्थ्यांना या उपक्रमांचा लाभ होत आहे.

मित्रहो, आता काही महत्त्वाच्या बाबींविषयी मी विद्यार्थी मित्रांशी संवाद साधू इच्छितोः

१) आपल्या राष्ट्रीय जीवनात प्रसंगी वेगवेगळ्या गरजा निर्माण होत असतात. अशा वेळी आपण राष्ट्रकार्यासाठी सदैव तत्पर असले पाहिजे. या वर्षी मा. पंतप्रधानांनी निश्चलीकरणाचा निर्णय घेतल्यानंतर नागरिक म्हणून आपण सर्वांनी सहकार्य केले. आता राष्ट्र उभारणीसाठी डिजिटल पेमेंट प्रक्रियेत आपण सहभाग दिला पाहिजे. या प्रसंगी मी विद्यापीठातील आणि संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी डिजिटल पेमेंट प्रक्रियेचा प्रसार करण्यासाठी जे परिश्रम घेतले त्याबद्दल समाधान व्यक्त करतो. आणि इतर विद्यार्थ्यांकडून परिसरातील व्यक्तींना त्याबाबत साक्षर करण्याची अपेक्षा व्यक्त करतो.

२) मित्रहो, आपल्या देशात आजही अनेक समाज दुर्गम भागात वास करतात. त्यांची विशिष्ट भाषा-संस्कृती व जीवनपद्धती असते. या समाजघटकांकडे आपण आदराने पाहिले पाहिजे. त्यांच्याविषयी आस्था राखली पाहिजे. मेळघाटातील कोरकू समाजातील कित्येक व्यक्तींनी आजही अमरावतीसारखे शहर पाहिलेले नाही. अशा समाजातील विद्यार्थी शिक्षणप्रक्रियेत सहभागी होतात तेव्हा त्यांना सामावून घेताना आपण अधिक स्वागतशील होण्याची गरज आहे.

३) मित्रहो, भारत हा इतर प्रगत राष्ट्रांशी स्पर्धा करणारा देश असल्याचे बोलले जाऊ लागले आहे. आजच्या सुसाट

प्रगतीच्या वेगात आपल्या नैसर्गिक संसाधनांची, पर्यावरणाची आपल्याला काळजी घ्यावी लागणार आहे. जैवविविधतेने नटलेल्या अत्यंत समृद्ध अशा आपल्या देशात नागरिकांच्या पर्यावरण बांधिलकी व संवर्धनकृतीची आवश्यकता निर्माण झाली आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी याबाबत सक्षम झाल्यास आपल्या देशातील वनस्पती, प्राणी, पक्षी इत्यादींचे संवर्धन होण्याला चालना मिळू शकेल.

४) मित्रहो, मानवी जीवनात ज्ञान-विज्ञानाएवढेच कला, क्रीडा यांनाही महत्त्व आहे. तेव्हा अभ्यासाबरोबरच एखाद्या कलेचा, क्रीडाविषयक छंदाचा अंगीकार करावा. त्यायोगे तुमच्या जीवनात आनंद निर्माण होईल. आनंदी, समाधानी व्यक्ती आपल्या आवतीभोवतीच्या जीवनात आनंद निर्माण करू शकते.

५) इथे, मी, आपले एका प्रेरणादायी कथेकडे लक्ष वेधू इच्छितो. टॅकाश कारोई या पिस्तूल नेमबाज खेळाडूची कथा लक्षात घेण्यासारखी आहे. टॅकाश कारोई हा हंगेरीयीन सैन्यात सार्जंट होता. १९३८साली तो देशातील सर्वोत्तम पिस्तूल नेमबाज होता. वयाच्या २८व्या वर्षी त्याने राष्ट्रीय पातळीवरील सर्व स्पर्धा जिंकलेल्या होत्या. १९४०च्या टोकियो येथील ऑलम्पिक स्पर्धांचा तो एकमेव संभाव्य विजेता होता. मात्र त्याच वेळी त्याच्या आयुष्यात एक दुर्दैवी घटना घडली. सैनिकी प्रशिक्षण कार्यशाळेत त्याच्या हातात बॉम्ब फुटला व त्यात त्याचा ज्या हाताने तो नेमबाजी करत असे असा उजवा हात पूर्णपणे निकामी झाला. या घटनेबरोबर टॅकाश कारोइचे ऑलम्पिक सुवर्णपदक मिळवण्याचे स्वप्नही उद्ध्वस्त झाले. पण कारोई खचून गेला नाही. गमावलेल्या हाताकडे पाहून कुढत बसणे त्याला मान्य नव्हते. तो फौलादी मनाचा होता. एक महिना इस्पितळात राहिल्यानंतर तो एकांतवासात गेला. आता त्याने उरलेल्या एकमेव डाव्या हाताने नेमबाजीचा सराव सुरू केला. उजव्या हाताची सगळी कामे त्याला डाव्या हाताने करावी लागत होती. त्या हातावर प्रचंड ताण पडत होता. पण त्याने जिद्द सोडली नाही. आणि काय आश्चर्य मित्रहो, उजवा हात गमावल्यानंतरही केवळ एका वर्षातच त्याने हंगेरीची राष्ट्रीय स्पर्धा जिंकली. ऑलम्पिक पदक मिळवण्याचे स्वप्न पूर्ण करण्यास मात्र त्याला वाट पाहावी लागली. कारण दुस-या महायुद्धामुळे १९४० आणि १९४४च्या ऑलम्पिक स्पर्धा होऊ शकल्या नाहीत. कारोईने आपले मनोबल राखत सराव सुरू ठेवला. आणि पुढे १९४८मध्ये लंडन येथे भरविण्यात आलेल्या ऑलम्पिक स्पर्धेचे पिस्तूल नेमबाजीचे सुवर्णपदक त्याने जिंकले. एवढेच नाही तर चार वर्षांनंतर हेलसिंकी येथील ऑलम्पिक स्पर्धेतील सुवर्णपदकही त्यानेच जिंकले.

मित्रहो, आपल्याही आयुष्यात असे क्षण येतात. यश, कौतुक समोर दिसू लागते व क्षणार्धात सारे हिरावून घेतल्या जाते. सारे जग आपल्याविरुद्ध झालेले आहे, आपणच एकमेव दुर्दैवी, अपयशी व्यक्ती आहोत, असे वाटायला लागते. आपण खचून जातो. पण असे घडेल तेव्हा टॅकाश कारोईची आठवण ठेवा. स्वतःला पुन्हा उभे करा.

भारतीय क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर हा डिसेंबर १९८९मध्ये सियालकोट येथील भारत-पाकिस्तान चौथ्या कसोटी दरम्यान वकार युनूसच्या चेंडूने जायबंदी झालेला होता. चेंडू नाकावर बसल्याने त्यातून रक्तस्राव होत होता. पण सचिनने भारताच्या ३८धावा ४गडी बाद या नाजूक स्थितीपुढे आपले दुखणे मनावर घेतले नाही. तो फलंदाजी करण्यासाठी जिद्दीने मैदानावर उभा राहिला आणि सामना वाचवणारी ५७धावांची खेळी त्याने केली. अनिल कुंबळेनेदेखील असेच एकदा मे २००२मध्ये सेंट जॉन ॲटीगुआ येथे वेस्ट इंडिजविरुद्ध खेळताना जिद्दीचे दर्शन घडविले आहे. फलंदाजी करताना मर्व डिलनचा चेंडू कुंबळेच्या जबड्यावर आदळला. तरी त्याने चार षटकं रक्ताळलेल्या अवस्थेत खेळून काढले. एक्स-रेत जबड्याचे हाड मोडल्याचे निश्चित झाले. दुस-या दिवशी कुंबळेला भारतात परत पाठवणार होते. पण विंडिजची फलंदाजी सुरू झाल्यावर भारताला स्पिनरची कमतरता भासू लागली. ब्रायन लारा खेळत होता. कुंबळेने मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला. मोडक्या जबड्याला बँडेज बांधून खेळाच्या मैदानावर तो उतरला. चौदा षटकं गोलंदाजी त्याने टाकली व ब्रायन लाराची मौल्यवान विकेट घेतली. मित्रहो, संघासाठी, देशासाठी खेळण्याची वृत्ती तुमच्यातील शौर्य जागवते त्याची ही उदाहरणे. ही लक्षात असू द्या. यांतून प्रेरणा घेतली तर तुमच्या हातूनदेखील अद्वितीय कामगिरी झाल्याशिवाय राहणार नाही. अशी अद्वितीय कामगिरी माझ्या विद्यार्थ्यांकडून घडो, अशी सदिच्छा व्यक्त करतो.

६) विद्यार्थी मित्रहो, पदवी घेतल्यानंतर तुम्ही तुमच्या वैयक्तिक जीवनाच्या प्रगतीत व्यग्र होऊन जाणार आहात. अशा वेळी शिक्षणप्रक्रियेतनं तुम्हाला प्राप्त झालेल्या शाश्वत मूल्यांना विसरू नका. या शाश्वत मूल्यांची सदैव जाणीव बाळगा. ती समाजात रुजविण्याचा आपापल्या परीनं प्रयत्न करावा, असे मी या प्रसंगी सांगीन.

पद्म भुषण डॉ.विजय भटकर

दीक्षांत समारंभाचे प्रमुख पाहुणे

ज्या संत गाडगे बाबांचे संदेश शिल्प आपण आज उभारले, त्या गाडगे बाबांचे करुणामय जीवन आपल्याला सतत प्रेरणा देत राहो. रवींद्रनाथ टागोरांच्या एका गीतात लिहिले आहे,

जीवन जॅखन शुकाये जाय

करुणाधाराए एशो...

म्हणजे जीवन जेव्हा सुकून जाईल, करुणेची धारा होऊन ये. त्यानुसार आपणही गाडगे बाबांपासून प्रेरणा घेऊन करुणेची धारा होऊन जगावे. भारताचे नंदनवन झाल्याशिवाय राहणार नाही. तुम्हाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

पुन्हा एकदा सर्वांचे स्वागत करतो. पदवी, पदके व पारितोषिके प्राप्त करणा-या विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करतो.

धन्यवाद !

जय हिंद, जय महाराष्ट्र !

*****

3) Ph.D. Completed during the Annual Report Year 2016-2017

Sr. No.	Faculty	Subject	Number of Ph.D. Completed.
1.	2.	3.	4.
1.	Arts	Marathi	10
		Hindi	5
		English	25
		Music	9
		Urdu	5
		Pali & Prakrit	1
		Sanskrit	1
2.	Social Sciences	Political Science	26
		Sociology	12
		Economics	18
		Library & Information Science	3
		History	31
		Home Economics	11
		Psychology	2
		Geography	7
		Social Work	2
		Mass Communication	1
3.	D.Litt. Degree	Philosophy	1
4.	Commerce	Business Management	11
		Commerce	26
		Business Economics	13
5.	Science	Biotechnology	8
		Zoology	17
		Chemistry	36
		Physics	20
		Mathematics	10
		Environmental Science	3
		Microbiology	9

1.	2.	3.	4.
		Geology	2
		Botany	12
		Computer Science	4
		Statistics	4
		Electronics	3
		Biochemistry	1
6.	Education	Education	25
		Physical Education	32
7.	Medicine	Pharm. Sci.	8
8.	Engineering & Technology	Electronics Engg.	24
		Comp. Sci. & Engg.	24
		Mechanical Engg.	9
		Chemical Technology	10
		Civil Engg.	9
		Electrical Engg.	4
		Information Technology	2
		Production Engg.	4
9.	Law	Law	5

४) दीक्षांत समारंभात कुलसचिवांनी घोषित केलेली प्राप्त देणग्यांची सूची

अ.क्र.	देणगी देणा-याचे नांव	देणगीचे स्वरूप	देणगीचे नांव	परीक्षा/ उद्देश	देणगीची रक्कम
१	२	३	४	५	६
१.	श्री डॉ. देविसिंह रामसिंह शेखावत अमरावती	सुवर्णपदक	श्रीमान रामसिंह जगतसिंह शेखावत सुवर्णपदक	भेषजी स्नातक	१,५०,०००.००
२.	डॉ. देविसिंह रामसिंह शेखावत अमरावती	सुवर्णपदक	श्रीमती जतनबाई रामसिंह शेखावत सुवर्णपदक	तांत्रिकी स्नातक (कॉस्मेटीक)	१,५०,०००.००
३.	श्री भंवरसिंह लालसिंह शेखावत अंमरावती	सुवर्णपदक	श्रीमान लालसिंह रामसिंह शेखावत सुवर्णपदक	व्यवसाय प्रशासन स्नातक	१,५०,०००.००
४.	डॉ. सुभाष सावरकर अमरावती.	व्याख्यानमाला	जनसारस्वत सुदाम सावरकर जन्मशताब्दी स्मृति प्रित्यर्थ मराठी जनसाहित्य व्याख्यानमाला	जनसारस्वत सुदाम सावरकर जन्मशताब्दी स्मृति प्रित्यर्थ मराठी जनसाहित्य व्याख्यानमाला	३,००,०००.००
५.	श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर	सुवर्णपदक	श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (वनस्पतिशास्त्र) (संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या पदव्युत्तर वनस्पतिशास्त्र विभागामधून)	१,५०,०००.००
६.	श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर अमरावती	व्याख्यानमाला	श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर व्याख्यानमाला	श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर व्याख्यानमाला	३,००,०००.००

५) पदके/पारितोषिके

दीक्षांत सभारंभात विद्यार्थी/विद्यार्थिनींना विविध अभ्यासक्रमात स्पृहणीय यश संपादन केल्याबद्दल प्रदान करण्यात आलेली विद्याशाखानिहाय पदके/पारितोषिके.

अ.क्र.	विद्यार्थ्यांचे नाव व महाविद्यालय	पदक/पारितोषिकाचे नाव	पात्रता परीक्षा	गुणानुक्रम
१	२	३	४	५
		कला विद्याशाखा		
१.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	मा. कुलपतींचे सुवर्णपदक व रु.१०००/- किंमतीची पुस्तके	वाङमय पारंगत (मराठी)	प्रथम श्रेणीसह
२.	कु. वैष्णवी नारायणराव दाभेकर लोकनायक बापुजी अणे महाविद्यालय, यवतमाळ.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुवर्णपदक	वाङमय स्नातक	प्रथम
३.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	श्रीमती शांताबाई शंकरराव लोंढे सुवर्णपदक	वाङमय पारंगत (मराठी)	प्रथम
४.	कु. कीर्ती प्रकाशराव लेकुरवाळे बहिःशाल, वरुड	प्राचार्य मफतलाल वाडीलाल नाईक सुवर्णपदक	वाङमय पारंगत (इंग्रजी)	प्रथम
५.	कु. कीर्ती प्रकाशराव लेकुरवाळे बहिःशाल, वरुड	टागोर सेमीनार १९८८ स्मृती सुवर्णपदक	वाङमय पारंगत (इंग्रजी)	प्रथम श्रेणीसह प्रथम
६.	कु. पूजा अनंतराव कडू शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	कै.न्यायमूर्ती पंजाबराव भगवंतराव ठाकरे स्मृती सुवर्णपदक	वाङमय पारंगत (भारतीय संगीत)	प्रथम

1	2	3	4	5
७.	रौनकजाहा अ. खलील शेख रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती.	स्व.सुखदेवराव शिवाजी सरकटे सुवर्णपदक	वाङमय स्नातक (पाली)	प्रथम
८.	कु. राधिका विवेक माहूरकर श्रीमती राधादेवी गोयंका महिला महाविद्यालय, अकोला.	प्रा.के.भास्कर नायर स्मृती रोख पारितोषिक रू. १,०००/-	वाङमय स्नातक (इंग्रजी वाङमय)	प्रथम श्रेणीसह प्रथम
९.	कु. धनश्री सुभाष लोणकर शंकरलाल खंडेलवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व.सौ.निला मुकुंद शुक्ला स्मृती सुवर्णपदक	वाङमय स्नातक (संस्कृत साहित्य)	प्रथम
१०.	कु. केतकी अनिरुद्ध खरे, श्रीमती राधादेवी गोयंका महिला महाविद्यालय, अकोला.	श्री यादवराव केशवराव अंधारे स्मृती रोख पारितोषिक रू.४५०/-	वाङमय स्नातक (भारतीय संगीत)	प्रथम
११.	कु. केतकी अनिरुद्ध खरे, श्रीमती राधादेवि गोयंका महिला महाविद्यालय, अकोला.	स्व. प्रभाकरराव नवसाळकर रौप्यपदक	वाङमय स्नातक (संगित)	प्रथम
१२.	कु. धनश्री सुभाष लोणकर शंकरलाल खंडेलवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	गुरुनारायण सुवर्णपदक	वाङमय स्नातक (संस्कृत)	प्रथम
१३.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे, पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सुवर्णपदक	वाङमय पारंगत (मराठी)	प्रथम श्रेणीसह प्रथम
१४.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे, पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	डॉ.व्ही.बी.उपाख्य भाऊसाहेब कोलते सुवर्णपदक	वाङमय पारंगत (मराठी)	प्रथम श्रेणीसह प्रथम

1	2	3	4	5
१५.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे, पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	श्री श्रीराम नामदेवराव शेळके सुवर्णपदक	वाङमय पारंगत (मराठी)	प्रथम श्रेणीसह प्रथम
१६.	कु. धनश्री सुभाष लोणकर शंकरलाल खंडेलवार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	लोकनायक माधव श्रीहरी उपाख्य बापूजी अणे सुवर्णपदक	वाङमय स्नातक (संस्कृत साहित्य)	प्रथम
१७.	कु. प्रीती सुभाष गहले, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट	स्व.श्रीमती सरस्वतीबाई आनंदराव राऊत सुवर्णपदक	वाङमय स्नातक (मराठी वाङमय)	प्रथम
१८.	कु. प्रीती सुभाष गहले, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट	स्व.श्रीमती यमुनाबाई गोडबोले रोख पारितोषिक रू.४५०/-	वाङमय स्नातक (मराठी वाङमय)	प्रथम
१९.	कु. प्रीती सुभाष गहले, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट	श्री भालचंद्र दामोदर बापट रोख पारितोषिक रू.४५०/-	वाङमय स्नातक (मराठी वाङमय)	प्रथम
२०.	कु. प्रीती सुभाष गहले, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट	श्री विनायकराव शंकरराव हुड रौप्यपदक	वाङमय स्नातक (मराठी वाङमय)	प्रथम
२१.	कु. संगीता हिरालाल जावरकर, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती.	राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हिन्दी अकादमी रोख पारितोषिक रू.१,९००/-	वाङमय पारंगत (हिन्दी)	प्रथम
२२.	कु. राधिका विवेक माहूरकर, श्रीमती राधादेवी गोयनका महिला. महाविद्यालय, अकोला.	वीर उत्तमराव मोहिते स्मृती सुवर्णपदक	वाङमय स्नातक (इंग्रजी वाङमय)	प्रथम

÷ä

1	2	3	4	5
२३.	कु. सुमैय्या फीरदोस सौ. इफतेखार अली बहिःशाल, अकोट	बेरार मुस्लिम एज्युकेशनल कॉन्फरन्स सुवर्णपदक	वाङमय स्नातक (उर्दु)	प्रथम
२४.	कु. केतकी अनिरुद्ध खरे, श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.	पंडित देवीदासपंत के. काळे गुरुजी रोख पारितोषिक रू.१,६२५/-	वाङमय स्नातक (भारतीय संगीत)	विद्यार्थिनींमधून प्रथम
२५.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे, पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	कविश्रेष्ठ सुरेश भट रोख पारितोषिक रू.१,६२५/-	वाङमय पारंगत (मराठी)	प्रथम
२६.	कु. ऐश्वर्या चंद्रकिशोर कुळकर्णी श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय, अकोला.	श्री दत्तात्रय शिखर संस्थान माहूर सुवर्णपदक	वाङमय पारंगत (संस्कृत)	प्रथम श्रेणीसह प्रथम
२७.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे, पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	साहित्यिक स्व.श्री दिनकर विष्णु जोशी स्मृती सुवर्णपदक	वाङमय पारंगत (मराठी)	गुणवत्ता यादीत प्रथम
२८.	कु. मेघा राजू अप्पा रूईकर, सीताबाई कला महाविद्यालय, अकोला.	सौ. इंदिरा राधेश्याम गणेडीवाल रोख पारितोषिक रु. ३५००/-	वाङमय स्नातक	गुणवत्ता यादीत द्वितीय
२९.	कु. प्रज्ञा रवींद्र सरोदे, पदव्युत्तर मराठी विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ	प्राचार्य श्रीहरी गायकवाड स्मृती सुवर्णपदक	वाङमय पारंगत (मराठी)	प्रथम
३०.	कु. रेणुका विश्वंभर पोफळकर, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती.	प्रा.हेमंत देसाई रौप्यपदक	वाङमय पारंगत (इंग्रजी)	द्वितीय

1	2	3	4	5
		विज्ञान विद्याशाखा		
३१.	कु. स्नेहल अशोकराव होले, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	रोटरी क्लब ऑफ अमरावती रौप्य महोत्सवी सुवर्णपदक	विज्ञान स्नातक	प्रथम
३२.	कु. स्नेहल अशोकराव होले, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	स्व.सौ. इंदुताई एस.दिक्षीत रौप्यपदक	विज्ञान स्नातक	विद्यार्थिनींमधून प्रथम
३३.	कु. स्नेहल अशोकराव होले, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	स्व.श्रीमती चंद्रभागाबाई भाऊराव निर्मळ स्मृती रौप्यपदक	विज्ञान स्नातक	विद्यार्थिनींमधून प्रथम
३४.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला	श्रीमती तापीबाई रामचंद्र बुब (शाहदा) रौप्यपदक	विज्ञान स्नातक	द्वितिय
३५.	कु. नेहा दीपक माहूरकर, पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,	स्व.प्रा.डॉ.एम.एम.म्हाला स्मृती सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (रसायनशास्त्र) व विज्ञान स्नातक भाग-१,२ व ३ मिळून प्रथम श्रेणीत उत्तीर्ण	प्रथम श्रेणीसह प्रथम
३६.	मो. अली पि. गुलाम मेहदी पदव्युत्तर प्राणिशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.	प्रा.हरिभाऊ भाऊराव निर्मळ रोख पारितोषिक रू.९५०/-	विज्ञान पारंगत (प्राणिशास्त्र)	प्रथम
३७.	कु. निकीता शशिकांत हिंगे शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	प्रा.डॉ.मनोहर आत्माराम ढोरे सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (वनस्पतिशास्त्र)	प्रथम

1	2	3	4	5
३८.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व.संजीव वसंत भोकरे व स्व.सौ. सारिका संजीव भोकरे सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (पदार्थविज्ञान)	प्रथम
३९.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	दलितमित्र पंढरीनाथ पाटील सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (पदार्थविज्ञान)	प्रथम
४०.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व. शरद नरसिंह आचार्य स्मृती रौप्यपदक	विज्ञान स्नातक (पदार्थविज्ञान)	प्रथम
४१.	श्री नितीन गौतम वाहूरवाघ, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट जि.अकोला.	श्रीमती भीमाबाई पंजाबराव जगताप (लोणीकर) सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (रसायनशास्त्र)	प्रथम
४२.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	श्री यशवंत माणिकराव वानखडे रोख पारितोषिक रु. ४५०/-	विज्ञान स्नातक (गणित)	प्रथम
४३.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व.नारायण कृष्ण गोडबोले रोख पारितोषिक रू.४५०/-	विज्ञान स्नातक (गणित)	प्रथम
४४.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व. मधुकर गोविंद जोशी रौप्यपदक	विज्ञान स्तानक (गणित)	प्रथम
४५.	कु. निकीता शशिकांत हिंगे, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती	स्व.प्राचार्य डॉ.जे.एल.श्रीमाळी स्मृती रोख पारितोषिक रू.९००/-	विज्ञान पारंगत (वनस्पतीशास्त्र)	प्रथम

1	2	3	4	5
४६.	कु. स्नेहल अशोकराव होले, श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती.	स्व. श्री एन.जे. रोंघे स्मृती सुवर्णपदक	सर्व स्नातक परीक्षांमध्ये सर्वाधिक टक्केवारीने सर्वोच्च गुण (विज्ञान स्नातक)	
४७.	कु. भुवनेश्वरी विठ्ठलराव वानखडे, श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व.प्राचार्य आर.के.सोनुने स्मृती रौप्यपदक	विज्ञान पारंगत (गणित)	प्रथम
४८.	कु. देवयानी मिलिंद गोले, पदव्युत्तर शैक्षणिक जीवतंत्रज्ञान विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,	डॉ.बिजरंका भगवंतराव कडू उपाख्य डॉ.बी.बी.कडू रौप्यपदक	विज्ञान पारंगत (जीवतंत्रज्ञान)	प्रथम श्रेणीसह प्रथम
४९.	कु. अम्मारा समन अयाज अहेमद खान, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला.	स्व.डॉ.श्रीपाद वामनराव चिंचाळकर (डि.एससी.) स्मृती सुवर्णपदक	विज्ञान स्नातक (पदार्थ विज्ञान)	प्रथम
५०.	कु. अनामिका अशोकराव वर्मा, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	स्व.बकारामजी पांडुजी ठाकरे स्मृती सुवर्णपदक	सर्व विषयांच्या विज्ञान पारंगत परीक्षांमध्ये टक्केवारीने सर्वाधिक गुण एंम.एससी. (स्टॅट.)	प्रथम
५१.	कु. नेहा दीपक माहूरकर पद. रसायनशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	प्रा.एन.एस.भावे रौप्यपदक	विज्ञान पारंगत (रसायनशास्त्र)	प्रथम
५२.	कु. निकीता शशिकांत हिंगे, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.	स्व.डॉ. स्मिता अशोक डांगरे (पुंड) स्मृती रौप्यपदक	विज्ञान पारंगत (वनस्पतिशास्त्र)	प्रथम

1	2	3	4	5
५३.	कु. दीक्षा दिनकर पवार श्री शिवाजी विज्ञान महाविद्यलय, अमरावती.	डॉ. के.जी. देशमुख - प्रथम कुलगुरू अमरावती विद्यापीठ सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (पदार्थविज्ञान)	प्रथम
५४.	कु. स्मिता पीटर रक्षीत, पद. सुक्ष्मजिवशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	स्व. पंजाबराव उर्फ दादासाहेब धनवटे सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (सूक्ष्मजीवशास्त्र)	प्रथम
५५.	मो. अली पि. गुलाम मेहदी पद. प्राणिशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	डॉ. ज्ञानदेव लक्ष्मणराव डाहाके सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (प्राणिशास्त्र)	प्रथम
५६.	मो. अली पि. गुलाम मेहदी पद. प्राणिशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	कै.प्रा. भालचंद्र दादाराव देशमुख रोख पारितोषिक	विज्ञान पारंगत (प्राणिशास्त्र)	प्रथम
५७.	कु. नेहा दीपक माहूरकर, पद. रसायनशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	श्रीमती रमाबाई उपाध्ये सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (रसायनशास्त्र)	प्रथम
५८.	कु. भुवनेश्वरी विठ्ठलराव वानखडे, श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला.	ॲड. कमलाकर प्रल्हाद जोग सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (गणित)	प्रथम
५९.	कु. तेजस्विनी विश्वेश्वरराव चौधरी पदव्युत्तर गणित विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,	श्रीमती प्रभाताई शंकरराव अढाव सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (गणित)	विद्यापीठाच्या गणित विभागातून प्रथम

1	2	3	4	5
६०.	मेहराजूद दीन तलाई पि. गुलाम रसूल तलाई पद. वनस्पतिशास्त्र विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	श्री त्र्यंबक गणपतराव कावलकर सुवर्णपदक	विज्ञान पारंगत (वनस्पतिशास्त्र)	विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागातून प्रथम
		विधी विद्याशाखा		
६१.	कु. दीपीका अशोक थोडगे, अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ.	बॅ.टी.एस.पाटील सुवर्णपदक	विधी स्नातक	प्रथम
६२.	कु. दीपीका अशोक थोडगे, अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ.	स्व.श्री.ए.एस.उपाख्य काकासाहेब आठल्ये स्मृती सुवर्णपदक	विधी स्नातक	प्रथम श्रेणीसह प्रथम
६३.	कु. दीपीका अशोक थोडगे, अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ.	स्व.सौ.चम्पादेवी सुखदेवजी मालाणी रौप्यपदक	विधी स्नातक	प्रथम
६४.	श्री अब्दुल कादिर सैफुद्दीन बोहरी, कै. ॲड. रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय, वाशीम.	ॲड.एल.एस.अळसपुरकर सुवर्णपदक	विधी पारंगत	प्रथम
६५.	श्री अब्दुल कादिर सैफुद्दीन बोहरी, कै. ॲड. रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय, वाशीम.	स्व. इंदिराबाई अभयेंद्र देसाई स्मृती सुवर्णपदक	विधी पारंगत	प्रथम
६६.	विद्यार्थी पात्र नाही.	स्व.श्री.एन.ए.उपाख्य बाळासाहेब आठल्ये स्मृती सुवर्णपदक	विधी स्नातक खालील विषयामध्ये ६०% गुण प्राप्त करणारा विद्यार्थी. 1.Jurisprudence 2.Criminal Procedure Code 3.Civil Procedure Code 4. Law of Evidence	प्रथम

1	2	3	4	5
६७.	श्री अब्दुल कादिर सैफुद्दीन बोहरी, कै. ॲड. रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय, वाशीम.	स्व.शांताबाई ज्ञानेश्वरराव बाबरेकर स्मृती सुवर्णपदक	विधी पारंगत (अंतिम)	प्रथम
६८.	कु. प्रीती ज्ञानदेवराव भोरे, विनायक विधी महाविद्यालय, अमरावती.	स्व.श्री शंकर लक्ष्मण वैद्य,ॲडव्होकेट, अमरावती स्मृती सुवर्णपदक	विधी पारंगत	द्वितीय
६९.	कु. दीपीका अशोक थोडगे, अमोलकचंद विधी महाविद्यालय, यवतमाळ.	स्व.ॲड.एन.आर. उपाख्य बाबासाहेब धनागरे स्मृती रोख पारितोषिक रु. ३५००/-	३ वर्षीय विधी स्नातक	प्रथम
७०.	कु.चारुलता प्रभाकरराव भोंडे, ड़ॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती.	श्री नितीन अरविंद देशमुख स्मृती रोख पारितोषिक, रुपये ३५००/-	५ वर्षीय विधी स्नातक	प्रथम श्रेणीसह प्रथम
		आयुःशल्य विज्ञान विद्याशाखा		
७१.	बीयाणी शुभम नंदकिशोर ड़ॉ. पंजाबराव उर्फ भाउसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.	स्व.सौ.कांताबेन निहालचंद शहा व स्व.रसिकलाल निहालचंद शहा स्मृती सुवर्णपदक	आयुःशल्य विज्ञान स्नातक (अंत्य) (सौतीक स्त्री रोग)	प्रथम
७२.	झा प्रतिभा प्रभास श्री वंसतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.	डॉ.भास्कर जगन्नाथ बनसोड सुवर्णपदक	आयुःशल्य विज्ञान स्नातक(अंत्य) (शल्य चिकित्सा)	प्रथम
७३.	झा प्रतिभा प्रभास श्री वंसतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.	डॉ.एस.के.पुन्शी रौप्यपदक	आयुःशल्य विज्ञान स्नातक (अंत्य)	प्रथम
७४.	ऋतुजा दिपक मायी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला .	स्व.श्री महादेवराव गंगारामजी पाटील सुवर्णपदक	आयुःशल्य विज्ञान स्नातक (अंत्य) भाग-१ (नेत्ररोग चिकित्सा)	प्रथम

1	2	3	4	5
७५.	बीयाणी शुभम नंदकिशोर ड़ॉ. पंजाबराव उर्फ भाउसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय,अमरावती.	डॉ.एन.व्ही.मुदलीयार सुवर्णपदक	आयुःशल्य विज्ञान स्नातक (अंत्य) (सौतिक स्त्रीरोग)	प्रथम
७६.	झा प्रतिभा प्रभास श्री वंसतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.	स्व.डॉ.राणी लक्ष्मीबाई गणपतराव राजवाडे ग्वालीयर रोख पारितोषिक रू.४५०/-	आयुःशल्य विज्ञान स्नातक (अंत्य)	प्रथम
७७.	ऋतुजा दिपक मायी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला	स्व.डॉ.श्रीधर रंगनाथ भट व स्व.श्रीमती शांताबाई श्रीधर भट रोख पारितोषिक रू.९००/-	आयुःशल्य विज्ञान स्नातक (अंत्य) (कान,नाक व घसा)	प्रथम
७८.	झा प्रतिभा प्रभास श्री वंसतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ.	डॉ.डब्ल्यु.आर.उपाख्य अण्णासाहेब कोरपे सुवर्णपदक	आयुःशल्य विज्ञान स्नातक(अंत्य) (औषधी)	प्रथम
१४.	श्री.मयंकर सिंग	डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावती		
१५.	श्री.मोंहम्मद.अय्याझ	श्रीमती केशरबाई लाहोटी महा., अमरावती		
१६.	श्री.सैय्यद नझीम	विद्याभारती महाविद्यालय, अमरावती		
१७.	श्री.जतीन यादव	गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळी		
१८.	श्री.अभिजित तिवालकर	गुलामनबी आझाद महाविद्यालय, बार्शीटाकळी		

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव - २०१६ चमू
आयोजक विद्यापीठ : वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी
आयोजक दिनांक : दिनांक २७ नोव्हेंबर २०१६, ते ०१ डिसेंबर, २०१६
सत्र २०१६-२०१७ मधील आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव आयोजनाबाबत माहिती

आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव आयोजन
आयोजक महाविद्यालय : एस.पी.एम.चे तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,चिखली जि.बुलढाणा
आयोजक दिनांक : दिनांक २७ ते ३० सप्टेंबर, २०१६

३) अभियांत्रिकी विभाग

अ) बांधून तयार झालेल्या इमारती व पूर्ण झालेले विद्युतीकरण कामे.

१) पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभाग इमारतीचे बांधकाम. (चवथा टप्पा)

२) पाणीपुरवठा योजना अंतर्गत ४ लक्ष लीटर पाणी टाकीचे बांधकाम.

३) पदव्युत्तर विद्यार्थ्यांकरिता वसतिगृह बांधकाम.

४) विस्तारित मूल्यांकन इमारत बांधकाम.

५) संत गाडगे बाबा संदेश शिल्प.

६) गृहविज्ञान विभाग येथे स्टुडीओ काम.

७) मानव व संसाधन विकास केंद्र इमारत.

ब) सध्या सुरू असलेली बांधकामे /विद्युत कामे.

१) शैक्षणिक विभागाचे प्रशासकीय केंद्र इमारत बांधकाम.

२) पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग इमारत बांधकाम (पाचवा टप्पा)

३) पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभाग इमारत बांधकाम. (तिसरा टप्पा)

४) पदव्युत्तर सूक्ष्मजीवशास्त्र विभाग इमारत बांधकाम. (पहिला टप्पा)

५) पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभाग इमारत बांधकाम. (दुसरा टप्पा)

६) संशोधक मुलांचे वसतिगृह इमारत बांधकाम.

७) व्यवसाय प्रबंधन विभाग, प्राणिशास्त्र, वनस्पतिशास्त्र विभागातील सेमिनार हॉलचे नुतनीकरण.

८) विस्तारीत ११ के.व्ही. चे विद्युत उपकेंद्र.

क) पुढे सुरू होणारी बांधकामे /विद्युत कामे.

१) मॉडेल डिग्री कॉलेज, बिरसींगपूर, बुलढाणा

२) केंद्रीय भांडार विभाग इमारत बांधकाम

३) सिंथेटीक टेनीस/बॉस्केटबॉल/ हॉलीबॉल / हॅन्डबॉल मैदाने बांधकाम.

४) विस्तारीत ११ के.व्ही. चे विद्युत उपकेंद्राकरिता इमारतीचे बांधकाम करणे.

५) ग्रंथालय विभागात दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता लिफ्ट

६) सोलर पॉवर प्लांट ५८० के.डब्ल्यू.पी. उभारणी करणे.

७) मेडा मार्फत वीज बचतीकरीता एल.ई.डी. प्रकारचे विविध उपकरणे लावणे.

८) निवासी ज्ञानस्त्रोत व संशोधन केंद्र इमारत बांधकाम.

९) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र इमारत बांधकाम.

१०) विद्यापीठ परिसरातील पाण्याचे पुनर्वापर करणेबाबत.

११) अधिसभा सभागृहाचे नुतनीकरण.

*****

४) उद्यान विभाग

१) जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षोरापण करणे

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून मा.कुलगुरू डॉ. मुरलीधर जी. चांदेकर यांच्या हस्ते ०५/०६/२०१७ रोजी ॲथेलेटीक ट्रॅक जवळील पाण्याच्या टाकीचे समोरील खुले प्रक्षेत्रावर विविध प्रजातीच्या रोपांची लागवड करण्यात आली. सदर कार्यक्रमाला विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

२) **विद्यापीठ परिसरातील जळावू लाकूड हिंदू स्मशान संस्थेला दान दिल्याबाबत**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा सामाजिक कार्यात सहभागी होण्याच्या दृष्टिकोनातून आणि हिंदू स्मशान संस्थेच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून विद्यापीठ परिसरामध्ये उपलब्ध असलेली सर्व जळावू लाकडे विक्री न करता हिंदू स्मशान संस्थेला विनामुल्य देण्यात यावी. असा व्यवस्थापन परिषदेने बाब क्र. २१८, दि. १४/११/२०१४ अन्वये निर्णय घेतल्यावर हिंदु स्मशान संस्थेला ११ टन ७३५ किलो वजनाचे जळाऊ लाकुड दान केलेले आहे.

३) **महाराष्ट्र शासनाच्या ०२ कोटी वृक्षलागवड योजनेअंतर्गत दि.०१ जुलै, २०१६ या दिवशी विद्यापीठ परिसरात मान्यवरांच्या हस्ते वृक्षोरापण करण्यात आले.**

महाराष्ट्र शासनाने सन २०१६ या पावसाळी हंगामात संपूर्ण महाराष्ट्र राज्यात ०२ कोटी वृक्षलागवड करण्याबाबत शासनाच्या संपुर्ण विभागाला व विद्यापीठाला निर्देशीत केलेले होते. या निर्देशाची अमलबजावणी व त्यानुषंगाने देण्यात आलेले वृक्षारोपणाची उद्दिष्ट पूर्ण करण्याकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे परिसरातील मुलींचे वसतिगृह क्र. १ च्या मागिल परिसरात १०० रोपे मान्यवरांचे हस्ते मा.कुलगुरूंच्या अध्यक्षतेखाली 'वनमहोत्सव' हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. या कार्यक्रमाकरिता मा. श्री. प्रवीणजी पोटे, पालकमंत्री अमरावती जिल्हा, मा.खासदार श्री आनंदरावजी अडसूळ व मा.आमदार श्री बच्चुभाऊ कडू तसेच शहरातील गणमान्य व्यक्ती, वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी, विद्यापीठाचे अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

४) **पुष्प प्रदर्शनी स्पर्धा :** (विद्यापीठाला प्राप्त पुरस्कार)

आयोजक : डॉ. पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांचे जयंती निमित्त
श्री शिवाजी कृषी महाविद्यालय अमरावती.

दिनांक : २६.१२.२०१६ ते २७.१२.२०१६

Rose Cut Flower		**बक्षिसांची संख्या**
१.	प्रथम क्रमांकाचे	०२
२.	द्वितीय क्रमांकाचे	०२
३.	उत्तेजणार्थ	०१

Other Cut Flower		**बक्षिसांची संख्या**
१.	द्वितीय क्रमांकाचे	०२
२.	उत्तेजणार्थ	०२

Coleus Flower		**बक्षिसांची संख्या**
१.	प्रथम क्रमांकाचे	०१

Phonix Plam (Pot)		**बक्षिसांची संख्या**
१.	द्वितीय क्रमांकाचे	०१

Fern (Pot)		**बक्षिसांची संख्या**
१.	द्वितीय क्रमांकाचे	०१

वरील प्रमाणे एकूण १२ बक्षिसे प्राप्त झालेली आहे. या बक्षिसाचे अनुषंगाने एकत्रितरित्या एक फिरती ट्रॉफी, प्रमाणपत्र व एक भेटवस्तू (काचाचे फ्लावर पॉट) प्राप्त झालेले आहे.

५) **पर्यावरण पुरस्कार :**

आयोजक : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

दिनांक : २०.१२.२०१६

अ.क्र.	पुरस्कृत संस्था /व्यक्ती	पुरस्काराचे स्वरुप
१.	स्व. भास्करराव शिंगणे कला, प्रा. नारायणराव गावंडे विज्ञान व आशालता गावंडे वाणिज्य महाविद्यालय, साखर खेर्डा, ता. सिंदखेड राजा, जि. बुलडाणा	स्मृतिचिन्ह, प्रशस्ती पत्र व रोख १५ ०००/-

*****

प्रकरण पाचवे

Development Schemes

1) Grants Received by University Teaching Departments / College teachers for research from U.G.C.

Sr.No.	Number of Departments/ Colleges	Number of Teachers	Total Amount (in Rs.)
1.	Number of Departments - 04	07	6198272 /-
2.	Number of Colleges - 17	29	5240157/-

2) Grants Received by Colleges during the Financial Year 2015-2016 From U.G.C.

	Sanctioned Schemes & Grants Allotted							
Number of Colleges	Building	Books & Journals	Sport Equipments	Laboratory Equipments	P.T.A.C.	F.I.P.	Others	Total
35	3948316/-	1836306/-	978000/-	1561733/-	337590/-	9984355/-	61062722/-	79709022/-

प्रकरण सहावे

विद्यापीठातील विविध उपक्रम

१) विद्यापीठातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र

विद्यापीठातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राद्वारे पुरविण्यात येणा-या सेवा/सुविधा :

१) उमेदवारांची नोंदणी

२) उमेदवारांचे नूतनीकरण

३) शैक्षणिक पात्रतेत वाढ, पत्त्यांतील बदल, दूरध्वनी बदल व इतर बदल

४) नियोक्ते / उद्योजक नोंदणी व माहिती अद्ययावत करणे

५) रिक्त पदे अधिसूचित करणे

६) रिक्त पदांची जाहिरात प्रसिद्ध करणे

७) पात्र उमेदवारांची यादी प्राप्त करून घेणे

८) रोजगार मेळाव्यांची माहिती

९) मनुष्यबळांची संख्या दर्शविणारे तिमाही विवरणपत्र ई-आर-१ सादर करणे

१०) मनुष्यबळांची पदनिहाय, शैक्षणिक पात्रता दर्शविणारे द्विवार्षिक विवरणपत्र ई-आर -२ सादर करणे

११) संस्था नोंदणी

१२) राज्यातील कुशल / प्रशिक्षित उमेदवारांचा डाटा बेस

१३) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम योजना

१४) इतर उपयुक्त सुविधा

१ जुलै २०१६ ते ३० जून २०१७ या कालावधीत केंद्राने केलेल्या कामकाजाचा आढावा :

१) उमेदवारांची नोंदणी संख्या.	:	४५१७
२) नियोक्त्याकडून अधिसूचित झालेल्या जागांची संख्या.	:	२३१
३) उमेदवारांची वेगवेगळ्या जागांसाठी पाठवणी केल्याची संख्या.	:	–
४) नोकरीस लागलेल्या उमेदवारांची संख्या.	:	–
५) नोंदणीपटावर उपलब्ध असलेल्या उमेदवारांची संख्या.	:	१३४५१
६) केंद्रात निरनिराळी माहिती मिळविण्याकरिता आलेल्या उमेदवारांची संख्या.	:	४४१
७) शिकाऊ उमेदवार कायद्याअंतर्गत पाठविलेल्या उमेदवारांची संख्या.	:	–
८) शिकाऊ उमेदवार म्हणून लागलेल्या उमेदवारांची संख्या.	:	–
९) नोंदणीच्या वेळी व्यवसाय मार्गदर्शन केलेल्या उमेदवारांची संख्या.	:	४७५
१०) नोंदणीपटावरील जुन्या उमेदवारांना बोलावून मार्गदर्शन केलेल्या उमेदवारांची संख्या.	:	–

११) निरनिराळ्या महाविद्यालयांत भेटी देऊन विद्यार्थ्यांना व्यवसायाबाबत, स्पर्धापरीक्षेबाबत, प्रत्यक्ष मुलाखत इत्यादींबाबत मार्गदर्शन केल्याची संख्या. : ४२

१२) महाविद्यालयात व्यवसाय मार्गदर्शन परिषदेचे आयोजन. : –

१३) स्वयं-उद्योग सुरू करण्यात आलेल्या उमेदवारांची संख्या. : –

१४) माहे जुलै २०१६ ते जून २०१७ या कालावधीत एकूण सहा माहिती पुस्तिका प्रकाशित करून सर्व महाविद्यालय, पदव्युत्तर विभाग प्रमुख व प्रशासकीय अधिकारी यांना (प्रत्येक महिन्याला ३०० प्रती) पाठविण्यात आलेल्या आहेत. : –

*****

२) राष्ट्रीय सेवा योजना

१) **राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी श्रमशक्तीद्वारे राबविण्यात आलेले कार्यक्रम :**

१. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन (अभियान)
२. वित्तीय साक्षरता अभियान
३. स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान जनजागृती
४. रक्तदान व रक्त निदान शिबिर
५. शेतक-यांची आत्महत्या संदर्भात रासेयो चे माध्यमातून मानसिक परिवर्तनाबाबत जनजागृती कार्यक्रम
६. जलव्यवस्थापन व जलसंधारण
७. हागणदारी मुक्त ग्राम अभियान
८. व्यक्तिमत्त्व विकास व जनजागृती कार्यक्रम
९. महिला सक्षमीकरण व आदिवासी विकास व जनजागृती कार्यक्रम
१०. एड्स संदर्भात प्रतिबंध व नियंत्रण जनजागृती कार्यक्रम
११. बेरोजगार युवक स्वयंरोजगार कार्यशाळा
१२. सनदी परीक्षा/स्पर्धा परीक्षा तज्ञाद्वारा मार्गदर्शन
१३. रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती कार्यक्रम
१४. विद्यार्थी श्रमशक्तीद्वारा मतदार जनजागृती मोहिम

मंजूर २५४०० विद्यार्थी संख्येच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे जिल्हानिहाय विद्यार्थी संख्या :

Sr. No.	Name of District	No of College	No. of NSS Units	Strength
1.	Amravati	72	112	9750
2.	Akola	23	36	3300
3.	Buldana	41	56	4900
4.	Yavatmal	40	59	4800
5.	Washim	21	33	2650
	Total	**197**	**296**	**25400**

२) **शिबिर / उपक्रम :**

अ.क्र.	शिबिर/उपक्रम व स्थळ	दिनांक	निवड झालेल्या/सहभागी विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयाचे नांव/ संख्या
१	२	३	४
विद्यापीठस्तरीय कार्यक्रम :			
१)	**वनमहोत्सव-२०१६** विद्यापीठ परिसर, संगाबाअवि, अमरावती.	**१ जुलै, २०१६**	दि. १ जुलै, २०१६ रोजी राज्य शासनाच्या निर्देशान्वये संपुर्ण महाराष्ट्रात २ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देशान्वये प्राप्त सुचनेनुसार सर्व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांना ५० वृक्ष लागवडीचे आवाहन विद्यापीठ स्तरावर करण्यात आले. दि.१ जुलै, २०१६ रोजी वनमहोत्सवाअंतर्गत वृक्ष लागवड कार्यक्रम राबवून त्यांचा केलेल्या कार्याचा अहवाल विद्यापीठाला तसेच जिल्हास्तरीय मुख्य वनसंरक्षक वनविभाग यांना सादर करण्याबाबत सूचित करण्यात आले होते. जिल्हा समन्वयकांकडून प्राप्त माहितीनुसार खालीलप्रमाणे जिल्हानिहाय वृक्ष लागवड झालेली आहे.

अ.क्र.	जिल्हा	वृक्षसंख्या
१.	अमरावती	३५००
२.	अकोला	१५९४
३.	बुलडाणा	३२९१
४.	यवतमाळ	३६४९
५.	वाशिम	११९१
	एकूण	**१३२२५**

तसेच दि. १ जुलै, २०१६ रोजी विद्यापीठ परिसरात मा.कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली व मा.ना. प्रवीणजी पोटे, पालकमंत्री, मा.आ.बच्चुभाऊ कडू, मा.खा.आनंदराव अडसुळ, मा.जिल्हाधिकारी किरणजी गित्ते, मा.कुलसचिव डॉ.अजय देशमुख, मा.संजीव गौर, मुख्यवनसंरक्षक, वनविभआग, अमरावती यांचे प्रमुख उपस्थितीत तसेच विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग प्रमुख तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच स्थानिक महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यापीठ मुलींचे वसतिगृह मागे १६५ वृक्षांचे वृक्षारोपण मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

१	२	३	४
२.	स्वयंरोजगार कार्यशाळा-२०१६ स्व.डॉ.के.जी. देशमुख श्रोतृगृह संत गाडगे बाबा अमरावती, अमरावती.	२५ जुलै, २०१६	सोमवार दि. २५ जुलै, २०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता स्व.डॉ.के.जी. देशमुख श्रोतृगृह, संत गाडगे बाबा अमरावती अमरावती मा.कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यापीठस्तरीय किमान कौशल्यावर आधारित एकदिवसीय स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. शैक्षणिक व सामाजिक गुणवत्ते सोबतच रासेयो स्वयंसेवकांना लघुउद्योगातून आर्थिक साहाय्य प्राप्त व्हावे. या उद्देशाने सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मा.सुनील देशपांडे संचालक, सम्पुर्ण बांबू केंद्र, लवादा, मेळघाट यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना बांबू पासून विविध शोभिवंत वस्तूंच्या संदर्भात उपयुक्त मार्गदर्शन तसेच रोजगार प्राप्ती संदर्भात उद्‌बोधन केले. कार्यक्रमाच्या मा.कुलगुरूंनी सुद्धा उपस्थित विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. याप्रसंगी डॉ.गणेश मालटे समन्वयक रासेयो यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना स्वयंरोजगाराच्या संदर्भातील शिका-बनवा-विका या तत्त्वानुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण कार्यशाळेच्या लाभ घेऊन विकसित होण्याचे आवाहन केले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे नमुदनुसार विद्यार्थी उपस्थित होते. **अ.क्र. | जिल्हा | विद्यार्थी संख्या** **मुले | मुली | एकूण** १. | अमरावती | १३७ | १२८ | २६५ २. | अकोला | १५ | १७ | २५ ३. | बुलडाणा | २३ | १२ | ३५ ४. | यवतमाळ | ३४ | १३ | ४७ ५. | वाशिम | ११ | ०९ | २० **| एकूण | २१० | १७२ | ३८२** तसेच जिल्हा समन्वयक प्रा.व्ही.एच.हिवरे, प्रा.कमलदास राठोड, प्रा.शुभांगी दामले, तसेच क्षेत्रीय समन्वयक प्रा.संगीता धंदर, प्रा.नरेश वानखडे, प्रा.कुमुदिनी जोगी व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मंदा नांदुरकर कार्यक्रम अधिकारी यांनी केले. सदर कार्यक्रम दोन सत्रामध्ये संपन्न झाला.

१	२	३	४
३.	तिरंगा रॅली-२०१६ विद्यापीठ परिसर, संगाबा अमरावती.	२२ ऑगस्ट, २०१६	दि. २२ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ७० व्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून तिरंगा रॅलीचे आयोजन विद्यापीठ परिसरात शआसन निर्देशान्वये करण्यात आले. याप्रसंगी संगाबा अमरावती विद्यापीठाचे कुलसचिव अजय देशमुख, डॉ. शशिकांत आस्वले वित्त व लेखाधिकारी, डॉ.गणेश मालटे, समन्वयक रासेयो, डॉ.राजेश जयपुरकर, संचालक (बी.सी.यु.डी)., डॉ.श्रीकांत पाटील, संचालक, प्रौढ व निरंतर विकास विभाग, श्री मंगेश वरखेडे, उपकुलसचिव विकास विभाग, श्री विलास नांदुरकर, जनसंपर्क अधिकारी, श्री विनोद गावंडे कार्यक्रम अधिकारी, प्रा.डॉ.जोशी, डॉ. दिनेश राऊत, डॉ. प्रशांत शिंगवेकर, प्रा.डॉ.मावळे, डॉ. शोभा रोकडे , प्रा.श्रीमती कोहळे, उपस्थित होते. मा. कुलगुरूंनी याप्रसंगी उपस्थितांना राष्ट्रभिमान जागृत करणारे उद्‌बोधन केले. याप्रसंगी विद्यापीठाचे कर्मचारी व अधिकारी स्वयंस्फूर्तीने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यापीठ व महाविद्यालयातील रासेयो व गैररासेयो स्वयंसेवक अंदाजे ३३५ उपस्थित होते.
४.	**विद्यापीठस्तरीय पूर्व गणतंत्र पथसंचालन व उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा - २०१६** विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.	**२५ ते २६ ऑगस्ट, २०१६**	विद्यापीठस्तरीय पूर्व गणतंत्र पथसंचालन व उत्कर्ष राज्यस्तरीय सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा निवड चाचणी शिबिराचे आयोजन विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती दि. २५ ते २६ ऑगस्ट, २०१६ रोजी करण्यात आले होते. सदर निवड चाचणी शिबिराला पाचही जिल्ह्यातून खालील प्रमाणे रासेयो स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

अ.क्र.	जिल्हा	विद्यार्थी संख्या		
		मुले	मुली	एकूण
१.	अमरावती	७०	४०	११०
२.	अकोला	२४	२८	३२
३.	बुलडाणा	२७	१६	४३
४.	यवतमाळ	२६	२४	५०
५.	वाशिम	०५	०२	०७
	एकूण	**१५२**	**९०**	**२४२**

१	२	३	४
			कायर्क्रम अधिकारी : **पुरुष - ०६ महिला - ०३ एकूण - ०९** याप्रसंगी राज्य व राष्ट्रीयस्तरीय गणतंत्र दिन पथसंचालन शिबिर तसेच उत्कृष्ट-सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेकरिता उपस्थित स्वयंसेवकांमधून निवड करण्यात आली. याप्रसंगी मा.कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर, मा.डॉ.अजय देशमुख व डॉ.गणेश मालटे यांनी महत्वाचे उद्‌बोधन व मार्गदर्शन करण्यात आले. डॉ.मिथिलेश राठोड, प्रा.अतुल पाटील, प्रा.संतोष यावले, प्रा.डॉ.दिलीप अलोणे, प्रा.शुभांगी दामले, प्रा.कमलदास राठोड या तज्ञांद्वारा निवड करण्यात आली.
५.	**स्वच्छता अभियान-२०१६** भवन परिसर, संगाबाअवि, अमरावती.	**२६ ऑगस्ट, २०१६**	दि. २६ ऑगस्ट, २०१६ रोजी विद्यार्थी भवन, विद्यार्थी परिसरात रासेयो विद्यार्थी श्रमशक्तीद्वारा स्वच्छता अभियानाअंतर्गत परिसर स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. याप्रसंगी डॉ.दिलीप अलोणे, प्रा.डॉ.मिथिलेश राठोड, प्रा.नरेंद्र वानखडे, प्रा.संतोष यावले, श्री राजेश पिदडी, इत्यादींसह बहुसंख्य रासेयो विद्यार्थी व विद्यार्थीनी एकुण २४२ उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.गणेश मालटे, समन्वयक रासेयो यांनी स्वच्छतेबाबत विद्यार्थ्यांना शपथ दिली.
६.	**मानवी अवयव दान दिन रॅली - २०१६** जिल्हा सामान्य रुग्णालय, रेल्वे स्टेशन, राजकमल चौक, श्याम चौक ते जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती.	**३०, ऑगस्ट, २०१६**	विभागीय आयुक्त शअरी गुप्ता, मा.जिल्हाधिकारी किरण गित्ते, महापौर सौ.नंदा कौर, मा.डॉ.अरुण राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक, डॉ.श्यामसुंदर निकम, स्थानिक महाविद्यालय रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शोभा रोकडे, डॉ.रिना लहरिया, डॉ.दिनेश राऊत, डॉ.सुमशिष दास, डॉ.एन.डी.पाटील, प्रा.अनिता सोनुले व रासेयो विभागाच्या वतीने श्री राजेश पिदडी सदर रॅलीमध्ये उपस्थइत होते. सदर रॅलीमधअये बहुसंख्य रासेयो विद्यार्थी उपस्थित होते.
७.	**रासेयो दिन-२०१६** **विद्यार्थी भवन,** संगाबाअवि, अमरावती.	**२४ सप्टेंबर, २०१६**	दि.२४ सप्टेंबर, २०१६ सकाळी ८.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिनाचे आयोजन विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे करण्यात आले. वर्धापन दिनाच्या अनुषंगाने मा. कुलसचिव डॉ.अजय देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली

१	२	३	४
			व डॉ.श्रीकांत पाटील, संचालक, प्रौढ व निरंतर विभाग, डॉ.राजेश चव्हाण, जिल्हा समन्वयक, प्रा.नरेंद्र वानखडे, प्रा.बाभुळकर इत्यादी उपस्थित होते. स्थानिक महाविद्यालयातील ७९ मुले व ६७ मुली रासेयो वर्धापन दिनाच्या अनुषंगाने मा.डॉ.अजय देशमुख, डॉ.श्रीकांत पाटील, डॉ.गणेश मालटे, डॉ.राजेश चव्हाण याप्रसंगी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री राजेश पिदडी यांनी केले.
८.	**स्वच्छता अभियान -२०१६ अमरावती रेल्वे स्टेशन**	**६ ऑक्टोबर, २०१६**	स्थानिक अमरावती रेल्वे स्टेशन व राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने रेल्वे स्टेशन परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी डॉ.गणेश मालटे, समन्वयक, रासेयो, श्री.कोटांगळे, रेल्वे स्थानक, प्रबंधक यांच्या प्रमुख उपस्थितीत सदर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. याप्रसंगी डॉ.शोभा रोकडे, डॉ.टि.बी.वानखडे, प्रा.साधना माहोड, प्रा.मंदा नांदुरकर, प्रा.अनिता सोनुले, श्री.राजेश पिदडी, व स्थानिक महाविद्यालयातील १२० रासेयो स्वयंसेवक व रेल्वे स्थानक कार्यालयातील कर्मचारी वर्ग सदर अभियानात सहभागी होते.
९.	**एड्स जनजागृती रॅली - २०१६** शासकीय इर्विन दवाखाना, अमरावती.	**३ डिसेंबर, २०१६**	मा.कुलगुरु मा.डॉ.मुरलीधर चांदेकर, मा.डॉ.अरुण राऊत, जिल्हा शल्य चिकित्सक, श्री वसंत लुंगे, अध्यक्ष, आय.एम.ए. बहुसंख्य नामांकित डॉक्टर व रासेयो स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व स्थआनिक महाविद्यालयातील ३०० रासेयो स्वयंसेवक सदर रॅलीत सहभागी झाले होते. एड्स जनजागृती प्रतिबंध व नियंत्रण संदर्भात जनजागृती हेतू सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सदर रॅलीचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन व नियोजन श्री साखरे व श्री राजेश पिदडी यांनी केले.
१०.	**जिल्ह्यास्तरीय रासेयो बळीराजा चेतना अभियान अमरावती जिल्हा** **यवतमाळ जिल्हा**	**२३ ते २९ डिसेंबर, २०१६** **१९ ते २१ डिसेंबर, २०१६**	मा.कुलगुरु मा.डॉ.मुरलीधर चांदेकर, यांच्या मौखिक निर्देशान्वये आत्महत्याग्रस्त शेतक-यांचे संदर्भाने सामाजिक जाणिवेतुन जनजागृती हेतु बळीराजा चेतना अभियान विद्यापीठाशी निगडीत क्षेत्रात राबविण्यात आले. अमरावती, अकोला, बुलडाणा, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यात जिल्हा समन्वयक डॉ.राजेश चव्हाण, प्रा.विवेक हिवरे, प्रा.डॉ.दिपक

१	२	३	४
			नागरिक,प्रा.कमलदास राठोड, प्रा.शुभांगी दामले यांच्या नेतृत्वात तसेच रॅलीच्या यशस्वीतेकरिता डॉ.दिलीप अलोणे, प्रा.प्रसाद मडावी, प्रा.संजय तिडक. प्रा.नागरे, प्रा.राटोड, प्रा.भोसले इत्यादींनी सहभाग दिला. रॅलीच्या अनुषंगाने रासेयो स्वयंसेवकांनी सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती केली.
११.	**स्वच्छ भारत व स्वस्थ भारत अभियानाअंतर्गत विद्यापीठस्तरीय जिल्हानिहाय विशेष शिबिराचे आयोजन** **अमरावती (शेंडगांव)** **अकोला (सोनाळा)** **बुलडाणा (राहुळ)** **यवतमाळ (देऊरवाडी)** **वाशिम (श्रीगिरी)** **(नागठाणा)**	९ ते १६ जानेवारी, २०१६	मा.कुलगुरु डॉ.मुरलीधर चांदेकर व डॉ.राजेश जयपुरकर संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ डॉ. राजेश जयपुरकर, संचालक महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ डॉ.गणेश मालटे, संचालक रासेयो यांनी सदर आयोजित शिबिरांना भेटी देऊन मार्गदर्शन केले. संबंधित जिल्हा समन्वयकांच्या नेतृत्वात सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियानांतर्गत विद्यापीठ कार्यक्रम समन्वयक डॉ.मनिषा काळे यांनीसुद्धा सदर शिबिरांना भेटी दिल्या. सदर शिबिराचा खर्च विद्यापीठ साधारण निधी व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानांतर्गत करण्यात आला. शिबिराला सहभागी प्राध्यापक व स्वयंसेवकांची माहिती खालील प्रमाणे-

जिल्हा	विद्यार्थी		
	मुले	मुली	एकूण
अमरावती	९३	८२	१७५
अकोला	६१	४०	१०१
बुलडाणा	६६	३७	१०३
यवतमाळ	५३	४७	१००
वाशिम	६९	४१	११०

जिल्हा	टिचर्स		
	स्त्री	पुरुष	एकूण
अमरावती	१४	१०	२४
अकोला	०२	०१	०३
बुलडाणा	०२	०२	०४
यवतमाळ	०३	०१	०४
वाशिम	०२	०२	०४
एकूण	**२३**	**१६**	**३०**

१	२	३	४
१२.	**युवा नेतृत्व कार्यशाळा २०१६** विद्यार्थी भवन, संगाबाअवि, अमरावती.	**११ ते १२ जानेवारी** २०१७	रासेयो युवा नेतृत्व कार्यशाळेचे आयोजन मा.कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ.राजेश जयपुरकर, सदर कार्यक्रमाला उपस्थित होते. याप्रसंगी वक्ते व मार्गदर्शक म्हणून डॉ. अविनाश मोहरिल, प्रा.हेमंत खडके, प्रा. अरविंद देशमुख, डॉ.स्वानंद पुंड, वणी, उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अनुषंगाने **३५० रासेयो स्वयंसेवक, ०६ रासेयो कार्यक्रम अधिकारी** सहभागी होते.
१३.	**महिला सक्षमीकरण** कार्यशाळा २०१७ विद्यार्थी भवन, संगाबाअवि, अमरावती.	**१९ ते २० जानेवारी, २०१७**	मा.कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर व डॉ.राजेश जयपुरकर, डॉ.गणेश मालटे, संचालक रासेयो, डॉ.राणी बंग, समाजसेविका, डॉ.नेहा खरे, उद्योजक, निलिमा आरज, पोलीस निरिक्षक, कु. शीतल मालटे, पोलीस उपनिरीक्षक, डॉ.जागृती शाह, स्त्री रोग तज्ञ, ॲड.प्राजक्ता मशीदकर इत्यादींनी या कार्यशाळेच्या अनुषंगाने सहभाग दिला. सदर कार्यशाळेत महिलांच्या विकासात्मक, सामाजिक व शैक्षणिक, संरक्षणात्मक, व्यावसायिक दृष्टिकोनातून मौलिक मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळेच्या अनुषंगाने ०७ महिला कार्यक्रम अधिकारी व ३२० रासेयो विद्यार्थिनींनी सहभाग दिला. सदर कार्यशाळा 'सुंदर मी होणार' या विषयाच्या अनुषंगाने संपन्न झाली.
१४.	**प्रशिक्षकांकरिता प्रशिक्षण कार्यक्रम** श्री शंकराचार्य महाविद्यालय, भिलाई, छत्तीसगढ, म.प्र.	**१८ ते २२ फेब्रुवारी, २०१७**	श्री राजीव गांधी, राष्ट्रीय संस्था, युवा विकास, श्री पेरुम्बंदर यांच्या सौजन्याने सामाजिक सद्भावना, मानवाधिकार व राष्ट्रीय एकात्मता या विषयाच्या अनुषंगाने प्रशिक्षकांकरिता प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती वतीने ०२ महिला व ०२ पुरुष रासेयो कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.
१५.	**मराठी भाषा गौरव दिन-२०१७** नेहरु मैदान ते सांस्कृतिक भवन, अमरावती.	**२७ फेब्रुवारी, २०१७**	राज्यशासनाच्या निर्देशान्वये २७ फेब्रुवारी, २०१७ मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले होते. सदर दिनाचे औचित्य साधून दु. २.०० वाजता मराठी भाषा गौरव दिन ग्रंथ दिंडी काढण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने मा.डॉ.कुलगुरू मुरलीधर चांदेकर, डॉ.राजेश जयपुरकर, डॉ.अजय

१	२	३	४
			देशमुख, कुलसचिव डॉ.जयकिरण तिडके (माजी प्र.कुलगुरू) डॉ.मनोज तायडे (अधिष्ठाता) संचालक डॉ.गणेश मालटे, परीक्षा नियंत्रक डॉ.जयंत वडते, डॉ.श्रीकांत पाटील, संचालक श्री मंगेश वरखेडे, विविध पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचे विभाग प्रमुख प्रशासकिय अधिकारी व कर्मचारी त्याप्रमाणे स्थानिक विविध महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी व रासेयो स्वयंसेवक सामाजिक संघटनांचे पदाधिकारी इत्यादी या ग्रंथदिंडीत सहभागी झाले होते. ग्रंथदिंडीच्या अनुषंगाने मराठी भाषा गौरवात्मक घोषवाक्य व त्यासंदर्भातील मौखिक माहिती या दिंडीत देण्यात येत होती.
१६.	**मतदार जनजागृती** रॅली-२०१७ संगाबाअवि परिसर, अमरावती.	**०७ जानेवारी,** २०१७	मा.एस.के. सहारिया, निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र शासन मुंबई व मा.कुलगुरू डॉ.मुरलीधर चांदेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत मतदार जनजागृती रॅलीचे उद्घाटन समारंभ विद्यापीठ परिसरात करण्यात आला. यावेळी मा.जिल्हाधिकारी श्री. किरण गित्ते, मा.डॉ.अजय देशमुख, जिल्हाधिकारी कार्यालय व विद्यापीठ प्रशासकीय अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते. मतदार जनजागृती अभियान प्रभावी व यशस्वी करण्याचे आवाहन श्री एस.के. सहारिया साहेबांनी केले. यशस्वी आयोजनास रासेयो क्षेत्रीय समन्वयक श्री संतोष यावले, व स्थानिक महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग दिला.
१७.	**आव्हान-आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व निवड चाचणी शिबिर - २०१७**		जिल्हा समन्वयक नेतृत्वात रासेयो जिल्हानिहाय आव्हान २०१७ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व निवड चाचणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिर तंज्ञांद्वारे आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत आग नियंत्रण, पुरस्थिती नियंत्रण व व्यवस्थापन संकट काळात करावयाच्या उपाययोजना अपघात कालावधीत घ्यावयाची दक्षता व करावयाचे प्राथमिक उपचार बौद्धिक सत्रांतर्गत शिबिराच्या अनुषंगाने उद्बोधन इत्यादी बाबींचा समावेश या शिबिरात करण्यात आला होता. सदर शिबिराचा खर्च विद्यापीठ आपत्ती व्यवस्थापन तरतुदी अंतर्गत करण्यात आला. सदर शिबिरात खालील नमुद केल्या प्रमाणे रासेयो स्वमन्वयक व कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग दिला.
	१) अमरावती विद्यार्थी भवन, संगाबाअवि	**२५ ते २६ फेब्रुवारी, २०१७**	
	२) अकोला श्री शिवाजी महाविद्यालय, अकोला.	**०२ ते ०३ मार्च, २०१७**	
	३) बुलडाणा जी.एस.कॉलेज, खामगांव	**०५ ते ०६ मार्च २०१७**	

१	२	३	४
	४) **यवतमाळ** सावित्री ज्योतिबा समाज कार्य महाविद्यालय, यवतमाळ	**०४ ते ०५ मार्च, २०१७**	
	५) **वाशिम** सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम	**०४ ते ०५ मार्च, २०१७**	

विद्यार्थी	मुले	मुली	एकूण
अमरावती	६१	४१	१०५
अकोला	७५	४५	१२०
बुलडाणा	५०	३१	८१
यवतमाळ	८०	३८	११८
वाशिम	७१	५४	१२५

कार्यक्रम अधिकारी	पुरुष	महिला	एकूण
अमरावती	०४	०२	०६
अकोला	०९	०२	११
बुलडाणा	०१	०१	०२
यवतमाळ	१४	०६	२०
वाशिम	१२	०५	१७

सदर प्रशिक्षण कार्यक्रमाला मागील सत्रातील राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन शिबिरात सहभागी स्वयंसेवकांना (mock drill) त्यांना प्राप्त माहितीच्या अनुषंगाने त्यांचे अनुभव व प्रात्यक्षिकांकरिता निमंत्रित करण्यात आले होते.

३) राज्यस्तरीय कार्यक्रम :

१)	**राज्यस्तरीय गणतंत्र पथसंचालन शिबिर, मुंबई - २०१७** स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, विद्यानगरी, कलिना कॅम्पस, मुंबई	**१६ ते २६** जानेवारी, २०१७	**राज्यस्तरीय गणतंत्र पथसंचालन २०१७ सदर खालील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.** १) श्री.आर.पी. मोहोड, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती. २) श्री.एल.ए. गोपाळ अभि. व तांत्रिकी महाविद्यालय, धामणगांव रेल्वे ३) रोहन तिवारी डॉ.सौ.कमलताई गवई अभि. व तांत्रिकी महा.दारापूर ४) लक्ष्मण भवाने अभि. व तांत्रिकी महाविद्यालय, बाभुळगांव ५) कु. चंचल चोपडे, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला ६) कु. साक्षी यावले श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती.

१	२	३	४
			७) कु.के.आर. कोहरे नानकीबाई वाधवानी महाविद्यालय, यवतमाळ.
२)	**उत्कर्ष-सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धा -२०१७** सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ, पुणे	**२६ ते ०१ मार्च, २०१७**	राज्यस्तरीय उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा करीता विद्यापीठाच्या वतीने डॉ.दिलीप अलोणे यांच्या नेतृत्वात ०९ मुले व ०९ मुली रासेयो स्वयंसेवक सदर स्पर्धेत सहभागी झाले होते. निबंध स्पर्धेतील पारितोषिक व पुरस्कार, रॅलीच्या उत्कृष्ट आयोजनाकरिता विद्यापीठाला प्राप्त झाला.
३)	**राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन, पथसंचालन शिबिर- २०१७** राजपथ, नवी दिल्ली	**०१ ते ३१ जानेवारी, २०१७**	१) विवेक गजानन तायडे कला महाविद्यालय, बुलडाणा २) कु. अनुराधा ठाकरे श्री.शिवाजी कला, विज्ञान म.वि. अकोला.
४)	**नेतृत्व गुणविकास प्रेरणा शिबिर - २०१६** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ, नागपूर	**२४ ते २८ ऑगस्ट, २०१६**	दि. २४ ते २८ ऑगस्ट, २०१६ या कालावधीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास प्रेरणा शिबिराचे आयोजन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, मुंबई यांच्या सौजन्याने व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपुर विद्यापीठाच्या वतीने करण्यात आले होते. सदर शिबिरात प्रा.सुशिल बत्तलवार, कार्यक्रम अधिकारी, मातोश्री नानीबाई घारफळकर विज्ञान महाविद्यालय, बाभुळगांव यांच्या नेतृत्वात रासेयो स्वयंसेवक ०५ मुले व ०५ मुली यांनी सहभाग घेतला. सदर शिबिराअंतर्गत सामाजिक समस्या व प्रश्नावर मौलिक मार्गदर्शन करण्यात आले.
५)	**राज्य व राष्ट्रीयस्तरीय पूर्व गणतंत्र दिन पथसंचालन शिबिर-२०१७** श्री. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर	**१७ ते १९ सप्टेंबर, २०१७**	दि.१७ ते १९ सप्टेंबर, २०१६ श्री शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर येथे राज्य व राष्ट्रीय स्तरीय पूर्व पथसंचालन निवड शिबिराचे आयोजन रासेयो कक्ष, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या सौजन्याने श्री शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या वतीने करण्यात आले होते. सदर शिबिरात विद्यापीठाच्या वतीने चमु व्यवस्थापक म्हणून प्रा.एस.बी. यावले, डॉ.के.जी. गवई अभि. व तांत्रिकि महाविद्यालय, दारापुर तसेच प्रा स्मिता जाधव, कला व विज्ञान महाविद्यालय, कु-हा, जि.अमरावती यांच्या नेतृत्वात १२ मुले व १२ मुली या रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

१	२	३	४
६)	**राज्यस्तरीय रासेयो पुरस्कार- २०१७** **शासन निर्णय** क्र.आर.ई.पी./ २०१७/(३४/१७) दि.१७/०६/२०१७	**२०१६-१८**	सत्र २०१६-१७ करिता शासन निर्णयाप्रमाणे खालील नमुदनुसार राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहे. १) उत्कृष्ट रासेयो प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार प्रा.डॉ.विनोद बन्सीले, व्यंकटेश कला-वाणिज्य महाविद्यालय, देऊळगांव राजा, जि. बुलडाणा २) उत्कृष्ट रासेयो स्वयंसेवक अतुल राजेंद्र राऊत, श्री.आर.एल.टी. विज्ञान महाविद्यालय, अकोला.
७)	**राज्यस्तरीय साहसी शिबिर - २०१७** गिरीजन शारीरिक शिक्षण महाविद्यालय, चिखलदरा	**१८ ते २२ जानेवारी, २०१७**	प्रा.व्ही.गजभिये, समाजकार्य महाविद्यालय, बडनेरा व प्रा.विद्या गावंडे, श्री.म.पवार, महाविद्यालय, मूर्तिजापूर यांच्या नेतृत्वात ०७ मुली व ०४ मुले रासेयो स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला.
८)	**राज्यस्तरीय साहसी शिबिर-२०१७** गिरीजीन शारीरिक शिक्षण महाविद्यालय, चिखलदरा	**१८ ते २२ जानेवारी २०१७**	रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या निर्देश व आर्थिक सहकार्याने रासेयो कक्ष, संगाबाअवि यांच्या मार्फत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, नॅशनल ॲडव्हेंचर फाऊंडेशन, अमरावती यांचे सहकार्याने राज्यस्तरीय साहसी क्रीडा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरात संगाबाअवि विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, एस.आर.टी.एम. विद्यापीठ, नांदेड, भारतीय विद्यापीठ, पुणे, एम.पी. कृषी विद्यापीठ, राहुरी, डॉ.पी.डी. कृषीविद्यापीठ, अकोला, गोंडवाना कृषी विद्यापीठ, गडचिरोली, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर इत्यादी विद्यापीठातुन ११ रासेयो कार्यक्रम अधिकारी व ५७ मुले व ३८ मुली रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते. सदर शिबिरात व्यायाम, रोप क्रासिंग, भिंतीवर चढणे, ट्रकिंग बरमा ब्रिज, इत्यादी साहसी क्रीडांशी संबंधित प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण देण्यात आले.

३) राष्ट्रीय कार्यक्रम :

१)	**राष्ट्रीय एकात्मता शिबिर - २०१७** राष्ट्रसंत तुकडोडी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर	**१५ ते २१ ऑक्टोबर, २०१६**	डॉ.सचिन साकरकर, आर.लाहोटी विज्ञान महाविद्यालय, मोर्शी यांच्या नेतृत्वात ०४ मुले व ०३ मुली रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

१	२	३	४
२)	**पुर्वगणतंत्रदिन पथसंचालन शिबिर - २०१६** महाराजजी सयाजीराव विद्यापीठ वडोदरा, गुजरात	**२ ते ११ डिसेंबर, २०१६**	०२ मुले व ०२ मुली रासेयो स्वयंसेवकांनी सदर पुर्वगणतंत्रदिन पथसंचालन शिबिरात सहभाग घेतला.
३)	साहसी शिबिर - २०१६ सोलंग, मनाली, हिमाचल प्रदेश	१० ते १६ डिसेंबर, २०१६	प्रा.एस.बी. यावले, सौ. कमलताई गवई अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, दारापुर यांच्या नेतृत्वात ०५ मुले व ०५ मुली रासेयो स्वयंसेवकांनी सदर साहसी शिबिरात भाग घेतला.
४)	राष्ट्रीय गणतंत्रदिन राजपथ न्यु. दिल्ली आंबेडकर भवन, राणी झाशी रोड, दिल्ली.	१ ते ३१ जानेवारी, २०१७	राष्ट्रीय सेवा योजना, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती वतीने रासेयो स्वयंसेवक १) श्री. विवेक गजानन तायडे, कला महाविद्यालय, बुलडाणा २) कु. अनुराधा ठाकरे, श्री शिवाजी कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, यांनी विद्यापीठाचे नेतृत्व केले.
५)	**सत्र २०१६-१७ मध्ये महाविद्यालय स्तरावरील विशेष शिबिर संख्या**	**माहे ऑक्टोबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१७**	

अ. क्र.	जिल्हा	महाविद्यालय संख्या	आयोजित शिबिर संख्या
१.	अमरावती	७२	६६
२.	अकोला	२३	२३
३.	बुलडाणा	४१	३९
४.	यवतमाळ	४०	३८
५.	वाशिम	२१	२१
	एकूण	**१९७**	**१८७**

३) विद्यार्थी कल्याण विभाग

१) वादविवाद, वक्तृत्व स्पर्धा :

अ) दि. ५ डिसेंबर २०१६ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी भवन येथे वादविवाद /वक्तृत्व चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये ०९ उत्कृष्ट स्पर्धकांची निवड करण्यात आली.

ब) दि. २० डिसेंबर, २०१६ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे आयोजित डॉ.पी.सी. अलेक्झांडर मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये स्व.एस.एस.के.आर. इन्नानी महाविद्यालय कारंजा लाड येथील विद्यार्थिनी कु. मेघा कोटक स्पर्धक म्हणून तर प्रा.डॉ.शुभांगी कोंडोलीकर यांनी चमू व्यवस्थापक म्हणून सहभाग घेतला.

क) शिक्षा मंडळ वर्धा तर्फे कमलनयन बजाज वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि. २२ व २३ जानेवारी २०१७ रोजी करण्यात आले या स्पर्धेमध्ये तक्षशिला म.वि. अमरावती येथील विद्यार्थिनी कु. तेजश्री निचडे या विद्यार्थीनीने स्पर्धक म्हणून तर प्रा.डॉ.रेखा वानखडे यांनी चमू व्यवस्थापक म्हणून सहभाग घेतला.

ड) दि. १२ जाने. २०१६ रोजी हुंडाविरोधी चळवळ मुंबई तर्फे आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेमध्ये शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था, अमरावती येथील विद्यार्थी श्री अंकुश रमेशराव मानकर यांनी स्पर्धक म्हणून सहभाग घेतला.

२) विद्यार्थी सुरक्षा विमा योजना :

सत्र २०१६-२०१७ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक विभागातील १,९१,२२८ विद्यार्थ्यांचा 'विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेतंर्गत ओरिएंटल इंन्शुरन्स कंपनी लिमिटेड, अमरावती या कंपनीकडून विमा काढण्यात आला.

३) Financial Aid to Students :

अ) **विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती :**

सत्र २०१६-२०१७ मध्ये विद्यार्थी कल्याण निधी मधून एकूण २२८ विद्यार्थ्यांना रुपये २,५८,०००/- एवढ्या शिष्यवृत्तीचे शोधन करण्यात आले.

शिष्यवृत्तीचा तपशील

स्नातक

अ.क्र.	शाखा	प्राप्त अर्ज		देय शिष्यवृत्ती		दिलेली शिष्यवृत्ती	
		नवीन	नूतनीकरण	नवीन	नूतनीकरण	नवीन	नूतनीकरण
०१.	वाङ्मय व समाज विज्ञान	१७२	१८	५४	६३	५४	१५
०२.	वाणिज्य	२३२	०७	२५	२९	२५	०५
०३.	विज्ञान	६०	०७	२८	२६	२८	०७
०४.	गृहविज्ञान	०१	...	०१	०१	०१	...
०५.	शिक्षण	...	...	०५	...	...	...
०६.	विधी	...	...	०२	...	...	...
०७.	वैद्यक	...	...	०२	...	...	...
०८.	आयुर्वेद	...	...	...	...	...	...
०९.	अभियांत्रिकी	४०	०२	२६	२०	२५	...
	एकूण	**५०५**	**३४**	**१५३**	**१३९**	**१३३**	**२७**

स्नातकोत्तर

अ.क्र.	शाखा	प्राप्त अर्ज		देय शिष्यवृत्ती		दिलेली शिष्यवृत्ती	
		नवीन	नूतनीकरण	नवीन	नूतनीकरण	नवीन	नूतनीकरण
०१.	वाङ्मय व समाज विज्ञान स्नातक	३१	...	३१	०७	२७	...
०२.	वाणिज्य	४८	०१	२८	०९	२८	०१
०३.	विज्ञान	०३	०२	१३	०७	०२	०२
०४.	गृहविज्ञान	...	...	...	...	...	...
०५.	शिक्षण	...	...	०२	...	...	...
०६.	विधी	...	...	०१	...	...	...
०७.	वैद्यक	...	...	०१	०१	...	...
०८.	आयुर्वेद	...	...	...	...	...	...
०९.	अभियांत्रिकी	०३	...	०८	०१	...	...
	एकूण	८२	०३	८४	२५	५७	०३

इतर शिष्यवृत्ती

अ.क्र.	शाखा	प्राप्त अर्ज	देय शिष्यवृत्ती	दिलेली शिष्यवृत्ती
१.	राष्ट्रीय सेवा योजना	०२	०८	०२
२.	राष्ट्रीय छात्र सेना	०४	०६	०४
३.	क्रीडा	...	०८	...
४.	सांस्कृतिक कार्यक्रम	०२	०८	०२
	एकूण	०८	३०	०८

ब) स्व.रामप्रकाश शामलाल राठी स्मृती शिष्यवृत्ती :

सत्र २०१६-२०१७ मध्ये स्व. रामप्रकाश शामलाल राठी स्मृती शिष्यवृत्ती बाबत एकूण ०५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु. १५००/- प्रमाणे एकूण रुपये ७,५००/- शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

क) संत गाडगे बाबा विद्याधन योजना :

सत्र २०१६-२०१७ मध्ये संत गाडगे बाबा विद्याधन योजने अंतर्गत एकूण ६४ विद्यार्थ्यांना त्यांच्या अधिकोषावरील व्याजाचे एकूण रुपये ४,९२,१४३/- एवढी राशी प्रदान करण्यात आली.

ड) विद्यार्थी कल्याण निधी अंतर्गत राबविण्यात येणा-या इतर योजना :

सत्र २०१७-१८ पासून विद्यार्थी कल्याण निधीवर मिळणा-या व्याजातून खालील योजना राबविण्यात येणार आहे :

१) संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजना

२) संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजना

३) संत गाडगे बाबा विद्यार्थिनी बस पास सवलत यजना
४) संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजना

विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे कार्यक्रम :

सत्र २०१६-२०१७ विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे खालीलप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

अ.क्र.	कार्यक्रमाचे नाव	स्थळ	दिनांक
	सत्र २०१६-२०१७ मध्ये विद्यापीठ विद्यार्थी परिषदे अंतर्गत कुठल्याच प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले नाही.		

*****

४) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग विद्यापीठ विद्यार्थी परिषद गठन

महाराष्ट्र शासनाच्या निदेशानुसार सत्र २०१६-१७ मध्ये
विद्यापीठ शैक्षणिक विभाग विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही.

*****

५) संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषद गठन

महाराष्ट्र शासन राज्य निवडणूक यांच्या निदेशानुसार सत्र २०१६-१७ मध्ये
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही.

इतर माहिती

दि. ०६ ते १४ डिसेंबर, २०१६ या कालावधीमध्ये राष्ट्रकुल संसदीय मंडळ मुंबई तर्फे नागपूर येथे ४६ व्या संसदीय प्रशिक्षण अभ्यासक्रमात राज्यशास्त्र या विषयाचे ०६ विद्यार्थी व एक अधिव्याख्याता सहभागी झाले होते.

****

६) गौरवान्वित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांतर्गत खाली नमूद केलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचा-यांना त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल तसेच योगदानाबद्दल दि. १ मे, २०१७ रोजी उत्कृष्ट सेवा गौरव प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहेत.

१) विद्यापीठ :

अ) शिक्षक : **डॉ. संदीप आनंदराव वाघुळे**
सहायक प्राध्यापक, पदव्युत्तर भौतिकशास्त्र विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.

ब) द्वितीय श्रेणी अधिकारी : **श्री विजय वामनराव जोशी**
अधीक्षक (भांडार विभाग)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

क) तृतीय श्रेणी कर्मचारी : **श्री श्रीराम दिनकर ढोले**
कनिष्ठ सहायक
सारणी शाखा, परीक्षा विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

ड) चतुर्थ श्रेणी कर्मचारी : **श्री. राजेंद्र गोविंदराव डायलकर**
शिपाई, विकास विभाग
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
अमरावती.

२) संलग्नित महाविद्यालये, स्वायत्त महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था स्तर :

अ) प्राचार्य : **डॉ. उदय विनायकराव नावलेकर**
प्राचार्य
आबासाहेब पारवेकर महाविद्यालय
यवतमाळ

ब) शिक्षक : **डॉ. शिरीष पंजाबराव देशमुख**
प्राध्यापक तथा विभाग प्रमुख
(रसायनशास्त्र विभाग)
श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
अकोला.

क) शिक्षकेतर कर्मचारी : **श्री नितीन वसंतराव खोब्रागडे**
प्रयोगशाळा परिचर
(प्राणिशास्त्र विभाग)
विद्याभारती महाविद्यालय, अमरावती.

****

७) वार्षिकांक स्पर्धा

आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा २०१६-२०१७ मध्ये सहभागी झालेल्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालयांपैकी खालील महाविद्यालयांचे वार्षिकांक पारितोषिकास पात्र ठरले.

बिगर व्यावसायिक महाविद्यालये (शहरी विभाग)

प्रथम	**'प्रतिभा'** विद्याभारती महाविद्यालय, अमरावती.
द्वितीय	**'भारती'** भारतीय महाविद्यालय, अमरावती.
तृतीय	**'सुगंध'** भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा.

व्यावसायिक महाविद्यालये (शहरी विभाग)

प्रथम	**"Techno Wing" - 2017** श्री.ह.व्या.प्र.मं. चे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, अमरावती.
द्वितीय	**"Techno Stream" 2017** प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा रेल्वे
तृतीय	**"INNOVATOR"-2017** सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती.

बिगर व्यावसायिक महाविद्यालये (ग्रामीण विभाग)

प्रथम	**'ज्ञानसाधना'** कला महाविद्यालय, मलकापुर.
द्वितीय	**'गुलमोहोर'** आदर्श विज्ञान, ज.भा. कला व बिरला वाणिज्य महाविद्यालय, धामणगांव रेल्वे.

तृतीय	१) **'ज्ञानदीप'** श्री वसंतराव नाईक महाविद्यालय, धारणी.
	२) **'अंतरंग'** कला व वाणिज्य महाविद्यालय, बोरी अरब.

व्यावसायिक महाविद्यालये (ग्रामीण विभाग)

प्रथम	**'अनुरंग' २०१७** अनुराधा इंजिनिअरींग कॉलेज, चिखली.
द्वितीय	**"Techno Rhythem" 2016** डॉ.राजेंद्र गोडे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲन्ड रिसर्च, अमरावती.

****

८) राष्ट्रीय छात्रसेना

जिल्हा	छात्रसेना विद्यार्थी		छात्रसेना अधिकारी		वार्षिक शिबीरात सहभागी				गणतंत्र दिवस संचलन शिबीर नवी दिल्ली सहभाग			बी प्रमाणपत्र उत्तीर्ण		सी प्रमाणपत्र उत्तीर्ण		युध एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत सहभाग		बाल सैनिक शिबीर, नवी दिल्ली सहभागी	
	मुले	मुली	पुरुष	स्त्री	मुले	मुली	अधिकारी पुरुष	अधिकारी स्त्री	मुले	मुली	अधिकारी	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली	मुले	मुली
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०
अमरावती	७६१	६१४	१३	८	६१९	४३८	१०	४	-	१	-	२२३	१४९	९१	३६	-	-	७	२
अकोला	२९५	२०४	८	२	१८६	१६०	४	२	१	-	-	७६	४६	३४	२१	-	-	६	-
बुलढाणा	६९३	२०२	११	-	४९८	१४५	८	-	-	-	-	१६८	४६	९२	२२	-	-	२	-
यवतमाळ	४४२	२०३	७	-	४१०	१६३	६	-	-	-	-	१३५	५४	५७	१९	-	-	-	-
वाशिम	४२	८	१	-	४२	८	१	-	-	-	-	३	३	-	-	-	-	-	-

९) जनसंपर्क विभाग - विविध कार्यक्रम

व्याख्यानमाला/वक्तृत्व स्पर्धा

विद्यापीठाला विविध दानदात्यांकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून जनसंपर्क विभागाद्वारे अहवाल काळात खालील व्याख्यानमालांचे आयोजन करण्यात आले होते :

१) प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला :-

प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प दि. २८ सप्टेंबर, २०१६ रोजी माऊली ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी शेगांव, जि. बुलढाणा येथे **'राष्ट्रसंतांच्या चिंतनाचा ध्यासःमाणूस व राष्ट्र'** या विषयावर संपन्न झाले. प्रमुख वक्ते डॉ. वंदन मोहोड, अकोला यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वित्त व लेखा अधिकारी डॉ. शशीकांत आस्वले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, श्री ज्ञानेश्वर पुरुषोत्तम पाटील, अध्यक्ष, माऊली ग्रुप ऑफ इन्स्टिटयूशन्स शेगांव, जिल्हा बुलढाणा, श्री मधुभाऊ घारड, अध्यक्ष, प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती अमरावती, प्राचार्य, डॉ.सी.एम. जाधव, माऊली ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स कॉलेज ऑफ इंजडिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी शेगांव, जि. बुलढाणा, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर व्यासपीठावर उपस्थित होते.

द्वितीय पुष्प दि. २७, सप्टेंबर, २०१६ रोजी जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती येथे **'राष्ट्रसंतांची ग्रामगीता विकासाची गुरुकिल्ली'** या विषयावर संपन्न झाले. प्रमुख वक्ते डॉ. वंदन मोहोड यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाचे संचालक, डॉ. श्रीकांत पाटील उपस्थित होते. याप्रसंगी डॉ. दिनकरराव गायगोले सदस्य, स्थानिक महाविद्यालय व्यवस्थापन, श्री मधुभाऊ घारड, अध्यक्ष प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती, डॉ. रामेश्वर मा.भिसे, प्राचार्य, जे.डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, शहरातील गणमान्य नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

२) प्रथम कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला :-

प्रथम कुलगुरू डॉ.के.जी. देशमुख स्मृती व्याख्यानमाला दि. ३ ऑक्टोंबर, २०१६ रोजी जी.एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव, जि. बुलढाणा येथे आयोजित करण्यात आली होती. **'उच्च शिक्षणाचे भवितव्य'** या विषयावर सदर व्याख्यानमाला संपन्न झाली. प्रमुख वक्ते माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ व वाय.सी.एम.ओ.यु., मा.डॉ. राजन वेळूकर यांनी अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, मा.श्री. नरेन्द्रजी बोबडे, अध्यक्ष, विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ, खामगांव,जि. बुलढाणा, दानदात्या मा.डॉ. कमलताई काशीराव देशमुख,डॉ. धनंजय तळवणकर, प्राचार्य, जी.एस. विज्ञान कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव, विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर, व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी, शहरातील गणमान्य नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

****

१०) श्री. संत गाडगेबाबा अध्यासन केंद्र

१) संत गाडगेबाबांच्या जीवन कार्याचा प्रसार व प्रचार होण्याच्या दृष्टिकोनातून संलग्नित महाविद्यालयांमध्ये नाट्यप्रयोग सादरीकरण करण्यात आले.

२) संत गाडगेबाबांची जयंती निमित्त २३ फेब्रुवारी रोजी रॅलीचे आयोजन करून नेहरू मैदान ते समाधी मंदिरापर्यंत मिरवणूक घेण्यात येते.

३) संत गाडगेबाबांच्या विचारांचा प्रसार करण्याचे दृष्टीने व्याख्यानमालेचे आयोजन सुरू आहे.

४) विविध ठिकाणी गाडगेबाबांच्या चित्रप्रदर्शनीचे आयोजन करण्यात येत आहे.

११) आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग

आजीवन अध्ययन आणि विस्तार विभागातर्फे २०१६-१७ या वर्षात खालील प्रमाणे कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

अ.क्र.	आयोजित महाविद्यालयाचे नाव	कार्यशाळेचा विषय
१	२	३
१.	समाजकार्य महाविद्यालय अंजनगांव बारी रोड, तंत्रनिकेतनच्या बाजुला, बडनेरा रेल्वे, अमरावती.	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२.	श्रीमती कोकीळाबाई गावंडे महिला महाविद्यालय, दर्यापूर	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
३.	महात्मा ज्योतीबा फुले वाणिज्य-विज्ञान व विठ्ठलराव राऊत कला महाविद्यालय, भातकुली ता. भातकुली, अमरावती.	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
४.	श्री शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती.	मूल्यशिक्षणाचे संस्कार युवा पिढीवर रुजविण
५.	कला व विज्ञान महाविद्यालय कु-हा ता. तिवसा, जि. अमरावती.	वक्तृत्व वादविवाद स्वयंस्फुर्त भाषण
६.	जगदंबा महाविद्यालय अचलपूर शहर ता. अचलपूर, जि. अमरावती.	उच्च शिक्षण आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची
७.	श्री वसंतराव नाईक महाविद्यालय धारणी	स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन
८.	विनायक विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय नांदगांव खंडेश्वर, जि.अमरावती.	मूल्यशिक्षण समाज प्रबोधन
९.	शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय अमरावती.	मोबाईलच्या अत्याधिक वापरामुळे तरुण पिढीचे भविष्य आणि त्याला आलेले शारीरिक अपंगत्वाचे सर्वेक्षण निष्कर्ष
१०.	महात्मा ज्योतिबा फुले कला व विज्ञान महाविद्यालय	मूल्यशिक्षण राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन जगण्यासंबंधी विचार

१	२	३
११.	जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर, जि. अमरावती.	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
१२.	श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कॉलेज ॲन्ड इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती.	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
१३.	कै. बबनराव देशमुख महाविद्यालय, जि.अमरावती.	विविध विषयांवर ज्ञानात्मक व्याख्याने
१४.	भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, अचलपूर कॅम्प, जि. अमरावती.	मूल्यशिक्षण (राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे जीवन जगण्यासंबंधीचे विचार)
१५.	संत गाडगे बाबा महाराज महाविद्यालय, मूर्तिजापूर, जि. अकोला.	संत साहित्य आणि मूल्यशिक्षण
१६.	श्री संत गाडगे बाबा महाराज कला महाविद्यालय, बोरगांव मंजू, जि. अकोला.	संत साहित्य आणि मूल्यशिक्षण
१७.	श्री. धाबेकर कला महाविद्यालय, खडकी जि. अकोला	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
१८.	राधादेवी गोयंका महिला महाविद्यालय जि.अकोला	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
१९.	श्री.शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२०.	भाऊसाहेब लहाने ज्ञानप्रकाश कला महाविद्यालय पिंजर जि.अकोला	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२१.	श्री. राधाकिशन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय अकोला	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२२.	बी.एस.कला एन.जी.विज्ञान ए.जी.वाणिज्य महाविद्यालय साखरखेड जि.बुलढाणा	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२३.	पंकज लढ्ढा इन्स्टीट्यूट टेक्नॉलॉजी मॅनेजमेंट स्टडीज	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२४.	जी.एस कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव जि. बुलडाणा	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२५.	मॉडल डिग्री महाविद्यालय, जि. अकोला	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
२६.	जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा जि. यवतमाळ	मूल्यशिक्षण, सामाजिक प्रकल्प तथा सर्वेक्षण
